अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
पार्सल सुविधा उपलब्ध..
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १२.०८.२०२५ | अंक नं. ११४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
+
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
15%*
पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगर विधानसभा मतदारयादीत तब्बल २४ हजार २६० दुबार नावे

### मयत स्थलांतरितांच्या नावांचाही समावेश, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार

नगर – देशात आणि राज्यात सध्या मतदार याद्यांमधील घोटाळे गाजत असताना अहिल्यानगर शहरामधील विधानसभा मतदार यादीतही तब्बल २४ हजार २६० मतदारांची नावे दुबार असल्याचे समोर आले आहे. ती संख्या आणखी वाढली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच भरपूर प्रमाणामध्ये मयत व्यक्तींची नावे देखील सदयस्थितीला मतदार यादीत उपलब्ध आहेत. ही दुबार, मयत व स्थलांतरीत झालेल्या मतदारांची नावे तातडीने मतदार यादीतून वगळण्यात यावीत अशी मागणी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते रविंद्र वाबळे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की, आम्ही केलेल्या मतदार यादीच्या अवलोकनावरुन अहिल्यानगर शहरामधील सर्व प्रभांगामधील दुबार मतदारांची संख्या २४ हजार २६० व त्यापेक्षा जास्त नावे आम्हास निदर्शनास आलेले आहेत. त्या सर्व दुबार मतदारांची नावांची यादी यादीभागासह प्रत्येक मतदार यादी भागामध्ये दुबार नावे असलेल्या दुबार मतदारांची संख्या या तक्रारीत नमूद करुन देत आहोत. तसेच अहिल्यानगर शहराच्या मतदार यादीमध्ये मतदार यादीभाग १ ते मतदार यादी भाग २९७ यामध्ये भरपूर प्रमाणात मयत मतदार सदयस्थितीला आहेत.

### १० वर्षांपासुनचे मयतही मतदार यादीत

तरी अहिल्यानगर महापालिकेमध्ये मागील १० वर्षामध्ये ज्या सर्व अहिल्यानगर शहरामधील नागरिकांना मृत्युच्या दाखल्यांचे प्रती दिल्या. *(पुढील मजकूर पान २ वर)*

पाहिजेत
अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपिढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहिल्यानगर शाखेसाठी हवे आहेत.
मॅनेजर जागा 1 (M) — पदवीधर व तत्सम पदावर किमान 5 वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक.
सेल्समन जागा 5 (M/F) — तत्सम पदावर कामाचा किमान 2 वर्षे अनुभव पगार : 15000 ते 16000 हजार
नवीन उमेदवारास पगार : 12000 ते 13000 हजार
मोड कारागिर जागा 2 (M) — सोने-चांदी मोडीचा अनुभव आवश्यक अनुभवी उमेदवारास प्राधान्य.
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
- सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी -
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512

# महाराष्ट्रात १५ हजार पोलिसांची भरती होणार

मुंबई – राज्यात तब्बल १५ हजार पोलिसांची भरती करण्याच्या महत्त्वकांक्षी प्रस्तावाला राज्य मंत्री मंडळाच्या १२ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील हजारो तरुण गत अनेक वर्षांपासून या पोलिस भरतीची प्रतिक्षा करत होते. अखेर सरकारने हा निर्णय हातावेगळा करून त्यांची मागणी पूर्ण केली आहे. प्रस्तुत निर्णयामुळे राज्यातील हजारो तरुणांचे पोलिस बनण्याचे स्वप्न साकार होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत राज्यात सुमारे १५ हजार पोलिसांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारच्या निर्णयानुसार, कोणत्या जिल्ह्यात किती भरती होणार हे अजून स्पष्ट झाले नाही. पण त्याची एक जाहिरात निघेल. त्यानंतर लवकरच पुढील प्रक्रिया सुरू होईल.

याशिवाय राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ करणे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण करणे. सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवासाकरिता Viability Gap Funding निधी देण्याचा निर्णय. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतील जामीनदाराच्या अटी शिथिल करण्याचा निर्णयही या वेळी घेण्यात आला.

चष्मा नको?
आता चष्मा घालवा कायमचा
Contoura Vision
लेसर नेत्रशस्त्रक्रिया शिबीर
मिळवा निर्दोष दृष्टी
लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा जागतिक विक्रम
आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या नेत्रतज्ञांची टीम
आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्षे अनुभवी केंद्र
एकाच छताखाली चष्म्याचा नंबर घालविण्यासाठी १६ प्रकारचे तंत्रज्ञान -०.५ ते -३० पर्यतं आणि +१८ पर्यंत कोणताही नंबर घालवा
40 व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष सवलत
शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५
वेळ : सकाळी ९ वा
स्थळ : वर्धमान, माणिक चौक, अहिल्यानगर
9112288611 8888982222
डॉ. कांकरियांचे
ASIAN EYE HOSPITAL AND LASER INSTITUTE
साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
www.asianeyehospital.com
www.saisuryasupervision.com

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
30 ते 70% डिस्काउंट सेल
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल..
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
फक्त चार दिवस
₹199/- मध्ये खरेदी करा
ऑफरपण..बक्षीसपण..काहीपण
14 ऑगस्ट 15 ऑगस्ट 16 ऑगस्ट 17 ऑगस्ट
* फक्त 199 मध्ये खरेदी करा * खरेदीवर बक्षीस जिंकण्याची संधी
* ऑफर फक्त अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखे करीता
* नियम व अटी लागू

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ऐन सणासुदीत नगरमध्ये स्वच्छतेचा बोजवारा; .. अन्यथा कचरा महापालिकेत आणून टाकणार

## घनकचरा व्यवस्थापन कंत्राटातील भ्रष्टाचाराबाबत सरकारकडे तक्रार करणार : माजी महापौर अभिषेक कळमकर

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने स्वच्छता अभियानात केंद्रस्तरावर बक्षिस मिळवल्याचा गवगाव करीत मनपाने स्वत:ची पाठ थोपटून घेतली. पाच कोटींचे बक्षिस मिळाल्याने आनंदोत्सवही साजरा करण्यात आला. प्रत्यक्षात नगर शहरातील परिस्थिती पाहिली तर शहराला अक्षरश: उकिरड्याचे स्वरूप आले आहे. शहरातून दररोज सुमारे १५० टन कचरा उचलला जात असताना ठेकेदाराला मात्र १९० ते २०० टन कचरा उचलण्याचे बिल अदा केले जाते. हा मोठा भ्रष्टाचार असून याबाबत आता खा.निलेश लंके यांच्या माध्यमातून राज्य सरकारकडे तक्रार करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी म्हटले आहे.


महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर आदी.

यासंदर्भात कळमकर यांनी मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, सध्या पावसाळ्याचे दिवस असून साथजन्य आजार पसरु नये यासाठी सार्वजनिक स्वच्छता महत्वाची आहे. एकीकडे मनपा प्रशासन डेंग्यु मुक्त अभियान राबवित असताना शहरात कचरा संकलनाचा बोजवारा उडालेला आहे. सार्वजनिक जागांवर कचऱ्याचे ढिगारे दिवसेंदिवस पडून आहेत. याठिकाणी मोकाट कुत्री, जनावरांचा उच्छाद झाला आहे. या कचऱ्याची दुर्गंधी व घाणीमुळे नगरकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अनेक दिवस कचरा संकलनासाठी घंटागाडी येत नसल्याने घरोघरी जमा झालेल्या कचऱ्याचे करायचे काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. नागरिकांचा रोष लक्षात घेवून मनपा निवडणुकीसाठी तयारी करणाऱ्या इच्छुकांनी स्वखर्चाने कचरा संकलन करुन तो बुरुडगाव कचरा डेपोपर्यंत नेण्याची व्यवस्था केली आहे. खरे तर मनपा प्रशासनासाठी नामुष्कीची बाब आहे. मनपाला स्वच्छता अभियानात बक्षिस रुपाने मिळालेल्या पाच कोटी रुपयांचे काय झाले, असा प्रश्नही यानिमित्त उपस्थित होत आहे.

कुठल्याही परिस्थितीत सर्वसामान्यांच्या कररुपी पैशांची उधळपट्टी, त्यातील गैरव्यवहार सहन केला जाणार नाही. यासाठी वेळप्रसंगी यासाठी शहरात ठिकठिकाणी जावून मनपाचा घनकचरा व्यवस्थापनातील गैरकारभार मांडण्यात येईल याची आयुक्त तथा प्रशासनाने नोंद घ्यावी. कारण लोकनियुक्त नगरसेवकांनी यापूर्वी वेळोवेळी सभागृहात घनकचरा व्यवस्थापन कामातील भ्रष्टाचाराबाबत आवाज उठवला होता. तरीही त्यात कोणतीही सुधारणा झाली नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे येत्या काळात शहर स्वच्छतेसाठी उपाययोजना न केल्यास कचरा जमा करून तो महानगरपालिकेच्या आवारात टाकून आंदोलन करण्यात येईल.

### ‘केंद्र सरकार’च्या ‘दिशा समिती’त खा.निलेश लंके यांनीही वेधले लक्ष

केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या योजनेतून अहिल्यानगर शहरात घनकचरा व्यवस्थापनासह अनेक योजना चालू आहेत. केंद्राच्या निर्देशानुसार नेमलेल्या दिशा समितीचे खा.निलेश लंके हे सहअध्यक्ष आहेत. त्यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत नगर मनपातील घनकचरा व्यवस्थापन कामातील भ्रष्टाचारासह इतर योजनांचा मुद्दा उपस्थित करून शहरातील सार्वजनिक स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. नगरकरांना चांगल्या मूलभुत सोयी सुविधा मिळणे अत्यावश्यक असल्याचे खा.लंके यांनी म्हटले आहे.

याप्रसंगी निलेश मालपाणी, सुदाम भोसले, रोहन शेलार, उमेश भांबरकर, अल्तमश जरीवाला, राम वाणी, प्रशांत दरेकर, रियाज कुरेशी, भीमराज कराळे, परवेझ शेख, राहुल घोरपडे, प्रमोद आढाव आदी उपस्थित होते.

# सुपा येथे विमानतळ उभारण्याची खा. निलेश लंके यांची केंद्र सरकारकडे मागणी

### औद्योगिक विकास, पर्यटन, संरक्षण आणि कृषी क्षेत्रासाठी महत्वपूर्ण पाऊल ठरेल

नगर – सुपा येथे स्वतंत्र ग्रीनफिल्ड विमानतळ उभारण्याची मागणी खासदार निलेश लंके यांनी नागरी उड्डयन मंत्री किंजारापू नायडू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. सुपा विमानतळाची तात्काळ उभारणी शक्य नसल्यास शिर्डी विमानतळाचा विस्तार करून सुपा परिसराशी जोडणी करण्याचा प्रस्तावही खा. लंके यांनी ठेवला आहे.

खा. लंके यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सुपा हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे औद्योगिक आणि व्यापारिक केंद्र आहे. सुपा एमआयडीसीसह अहिल्यानगर तसेच पुणे जिल्ह्यातील कारेगांव व रांजणगांव औद्योगिक वसाहती या परिसरात आहेत. या वसाहतींमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी मोठया प्रमाणावर गुंतवणूक केलेली आहे. मात्र विमान सेवा उपलब्ध नसल्याने उद्योगांचे दळणवळण, व्यापार, लॉजिस्टिक्स आणि वेळेचे नियोजन या सर्व गोष्टी अडचणीत येतात असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.


सुपा येथे विमानतळ उभारण्याच्या मागणीचे निवेदन केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री किंजारापू नायडू यांना देताना खा. निलेश लंके.

विमानतळाची सुविधा निर्माण झाल्यास सुपा आणि संलग्न परिसर हा एक मोठा औद्योगिक क्लस्टर बनू शकतो. विमानसेवा उपलब्ध झाल्यास गुंतवणूकदारांचा विश्वास वाढेल आणि स्थानिक रोजगार संधीही मोठया प्रमाणावर उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील उत्पादन मोठया प्रमाणावर पुणे, मुंबई आणि इतर शहरांमध्येही पाठवले जाते. विमानतळामुळे वाहतूक खर्चात घट होउन उद्योगधंद्यांना मोठा फायदा होईल. विशेषतः निर्यातक्षम वस्तूंच्या दृष्टीने ही सुविधा अत्यंत फायदेशीर ठरेल. अहिल्यानगर जिल्हा हे धार्मिक पर्यटनासाठी ओळखले जाणारे ठिकाण आहे. शिर्डी, शनि शिंगणापूर, भिंगार, नगरचा भुईकोट किल्ला, अष्टविनायक मंदिरांना भेटी देण्यासाठी देश विदेशातून लाखो पर्यटक दरवर्षी भेट देताता. विमानतळामुळे त्यांच्या प्रवासात मोठी सुलभता निर्माण होईल व पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल. विमानतळाच्या या मागणीवर केंद्र सरकारने त्वरित निर्णय घ्यावा असे आवाहन खा. लंके यांनी मंत्री किंजारापू नायडू यांच्या भेटीदरम्यान केले. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, हा निर्णय केवळ सुपा नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.


### संरक्षण व कृषी क्षेत्रासाठी महत्वाचे

अहिल्यानगर येथे देशातील एकमेव आर्मर्ड कोर सेंटर व टँक फॅक्टरी आहे. संरक्षण क्षेत्राच्या दृष्टीने या परिसरात तातडीने हालचाली करण्यासाठी विमानतळ आवश्यक आहे. यामुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही हे महत्वपूर्ण पाऊल ठरेल. अहिल्यानगर जिल्हा हा डाळिंब, द्राक्ष, ऊस, कांदा अशा दर्जेदार शेती उत्पादनांसाठी प्रसिध्द आहे. विमानतळ उपलब्ध झाल्यास या उत्पादनांचा निर्यात व्यवसाय अधिक सक्षम होईल. शेतकऱ्यांना थेट जागतिक बाजारपेठ गाठण्याचा मार्ग मोकळा होईल.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
‘मुसाफिर’–९८२२०२०६९१

### जरा विसावू या वळणावर...



२०१९ कोरोना काळ होता. कामावर निरंतर असतानाही लिहिण्याची बुद्धी गणरायाने दिली आणि म्हणता म्हणता ६ वर्षे होऊन गेली.

आज अंगारकीच्या शुभदिनी थोडंसं थांबावं म्हणतोय. काहीसा विसावा घ्यावा वाटतंय. अक्षरधन... एखादा महत्त्वाचा मुद्दा, विषय, विचार वाचनीय, मननीय, प्रेरणादायी असतो. त्यावर अगदी थोडक्यात लिहून संवेदनशील, सृजनशील वाचकांना प्रेरणादायी ठरावा. शुद्ध हेतू या मागचे प्रयोजन होते.

द्विधा अन् विषमतेने भारलेल्या आजच्या समाजात परंपरा, संस्कृती व चांगुलपणा मागे पडतोय असं वाटतयं. फास्टफूड प्रमाणे बऱ्याचशा अपायकारक आभासी सोशल मिडीयाचा दुष्परिणाम वाढतोय. समाज व राजकारणात विवेकाला जणु मुठमातीच दिली जात आहे. केवळ आणि केवळ भ्रष्टाचार स्वार्थ मग ते व्यक्तीगत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक वा अगदी वैश्विक...

यात निदान काही चांगल्या मुद्द्यांना सांगावं, त्यावर काही तरी वाचलं, चर्चिले जावे म्हणून हा प्रामाणिक प्रयत्न! मनाला भावलेल्या, समाजाला उपयोगी गोष्टींना प्रकट करावे या हेतूने हा लेख प्रपंच. सध्या थोडं थांबतोय...

या शहराच्या भूमीतल्या नवा मराठा सायंदैनिकात पहिल्यांदाच केलेल्या या प्रयत्नास सहकार्य केल्याबद्दल श्री. सुभाषशेठ व ललीतशेठ गुंदेचा यांचा मनापासून आभारी आहे.

सर्वज्ञात अज्ञात वाचक, स्नेहीजनांना धन्यवाद!

ज्येष्ठ ललीत लेखनकार स्व. पिंगे म्हणायचे ‘‘हातून सत्त्वशील लिहून होणं हे लेखकाला लाभणार विष्णुरुप दर्शनच असते.’’

– **किशोर गांधी** (९८२२०२०६९१)

## विजय कानडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नागापूर फुलारी मळा बालिकाश्रम रोड येथील विजय गणपत कानडे (वय ७८) यांचे ११ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पंकज, आनंद कानडे यांचे ते वडील होत.

## छबुबाई बनकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – शहरातील ज्येष्ठ नागरिक छबुबाई एकनाथ बनकर (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार विक्रम बनकर आणि किरण बनकर यांच्या त्या मातोश्री होत.



छबुबाई बनकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही अटळ धैर्य, संयम आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर संसार उभा केला. आयुष्यभर कुटुंबाच्या सुखासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छांचा त्याग करत मुलाबाळांना शिक्षण व संस्कार देण्यास प्राधान्य दिले. त्यांना धार्मिक व सामाजिक कार्याची विशेष आवड होती. विविध धार्मिक कार्यक्रम, उत्सव आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्या मनापासून सहभागी होत असत. त्यांच्या साध्या, प्रेमळ आणि मनमिळावू स्वभावामुळे परिसरातील अनेकांशी त्यांचे आत्मीय संबंध होते.

## तृतीयपंथी समाजाचे अध्यक्ष काजल गुरु यांचे निधन

नगर – तृतीयपंथी समाजाचे जिल्हाध्यक्ष काजल गुरु बाबू नायक नगरवाले यांचे १२ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. गेल्या दहा दिवसांपासून ते साईदीप हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल होते. मात्र, प्रकृतीत सुधारणा न झाल्याने आज त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



त्यांच्या निधनाची बातमी कळताच तृतीयपंथी समाजासह विविध सामाजिक क्षेत्रातून शोक व्यक्त केला जात आहे. काजल गुरु हे तृतीयपंथी समाजाच्या हक्कांसाठी व सन्मानासाठी आयुष्यभर झटणारे, निर्भीड नेतृत्व होते व तृतीयपंथीयांसाठी दफनविधीसाठी जागा नव्हती तर काजल गुरु यांनी जिल्हाधिकारी मनपा आयुक्त यांच्याशी वारंवार पत्र व्यवहार करून दफनविधीसाठी जागा उपलब्ध करून घेतली व समाजातील तृतीयपंथींना आपले हक्काचे स्थान मिळावे, समाजात त्यांचा सन्मान वाढावा यासाठी त्यांनी असंख्य लढे उभारले. केवळ आंदोलनच नव्हे तर समाजातील सदस्यांच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्याच्या प्रश्नांवरही त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक तृतीयपंथी हक्क चळवळी यशस्वीरीत्या पार पडल्या. काजल गुरु यांचे व्यक्तिमत्व सर्वसमावेशक होते. ते फक्त तृतीयपंथी समाजापुरते मर्यादित न राहता, गरजू आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठीही नेहमी पुढे असत. त्यांच्या निधनाने एक मोठे प्रेरणास्थान हरपल्याची भावना समाजात.

# नगर विधानसभा मतदारयादीत तब्बल २४ हजार २६० दुबार नावे

(पान १ वरुन)

त्या सर्व संगणकामधील वर्षनिहाय यादी मागवून घेऊन संबंधीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींची नावे अहिल्यानगर शहर मतदार यादीमध्यून वगळून टाकावीत. तसेच दुबार नावांसंदर्भात सध्या प्रत्येक नागरिकांकडे स्वतःचे आधारकार्ड व आधारनंबर आहे. दुबार नावा संदर्भामध्ये संबंधीत दुबार नावे असलेल्या नागरिकांनी मतदान कार्ड नोंदणी करताना मतदान नोंदणी विभागाकडे जे आधारकार्ड दाखल केले आहे. त्यावर असलेला पत्ता ग्राहय धरुन अन्य ठिकाणी असलेल दुबार नावे रदद करण्यात यावेत.

### बी.एल.ओ. मार्फत स्थळ पाहणी करुन कार्यवाही करावी

यासंदर्भात आपल्या कार्यालयामध्ये १ ते २९७ मतदार यादी भागांवर कामकाज करण्यासाठी २९७ बी.एल.ओ. शासकिय कर्मचारी उपलब्ध आहेत. आपण आपल्या मार्फत त्वरीत बी.एल.ओ. मार्फत स्थळ पाहणी करुन संबधीत दुबार नावे असलेल्या व्यक्तींची व बोगस नावे असलेल्या व्यक्तींची नावे, स्थलांतरील व्यक्तींची नावे अहिल्यानगर शहरातील प्रभाग क्रमांक १ ते प्रभाग क्रमांक १७ मधील त्वरीत वगळावी, रदद करावी अशी मागणी या तक्रार अर्जात वाबळे यांनी केली आहे.

### त्वरित कार्यवाही न झाल्यास न्यायालयात जाणार

आपण यापूर्वी १० जुलै २०२४ रोजी प्रभाग क्र. ८ मधील दुबार मतदारांच्या नावांची यादी आपल्या कार्यालयाकडे पुराव्यासहित दाखल केलेली होती. संबंधीत यादीवर देखील कुठल्याही प्रकारची ठोस कार्यवाही आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. प्रभाग क्र.८ मध्ये देखील आम्ही दिलेल्या यादीमधील नावे भरपूर प्रमाणात जसेच्या तसे सद्यस्थितीला उपलब्ध आहे.

आपण याबाबत त्वरीत १५ दिवसांमध्ये याबाबत कायदेशीररित्या कार्यवाही न केल्यास आम्ही याबाबत न्याय मिळण्यासाठी न्यायालयामध्ये जाणार आहोत. तरी ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्यामुळे आपण आपल्या विभागामार्फत याची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी व हे सर्व बोगस मतदारांची नावे, दुबार नावे त्वरीत रद्द करावीत. अशी मागणी त्यांनी केली आहे.

# देहरे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी जयश्री लांडगे यांची बिनविरोध निवड

नगर – नगर तालुक्यातील देहरे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी खा. निलेश लंके यांचे समर्थक किरण लांडगे यांच्या पत्नी जयश्री लांडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



सरपंच कल्याणी धनवटे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच निवडीसाठी ग्रामपंचायत कार्यालयात ११ ऑगस्टला ग्रामपंचायत सदस्यांची विशेष सभा झाली. या सभेमध्ये उपसरपंच पदासाठी जयश्री किरण लांडगे यांचा एकमेव अर्ज आला. त्यास ग्रामपंचायत सदस्य प्रकाश श्रीहरी लांडगे हे सूचक होते, त्यामुळे ही निवड बिनविरोध झाली.

यावेळी ग्रामविकास अधिकारी कृष्णा बडे, माझी सरपंच हिराबाई करंडे, माझी सरपंच नंदाताई भगत, ग्रा.पं. सदस्य अनिता रमेश काळे, अजित काळे, शितल अनिल चोर, साजिद शेख, अश्विनी शरद जाधव, रोहिणी नवनाथ करंडे, बाळासाहेब बर्डे उपस्थित होते.

यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य व्ही. डी काळे पाटील, अरुण लांडगे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अनिल लांडगे, माजी चेअरमन ज्ञानेश्वर लांडगे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नगर तालुका उपाध्यक्ष महेश काळे, माजी सरपंच संजय शिवाजी लांडगे, तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल पठारे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष रमेश काळे, माजी उपसरपंच अनिल करंडे, माजी चेअरमन यशवंत काळे, माजी सरपंच अमोल बानकर, आजी माझी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुनील बालवे, किशोर पठारे, सुहास गोपाळे, प्रणाम काळे, पोलीस पाटील चंद्रकांत खजिनदार, माजी चेअरमन भाऊसाहेब काळे, बबन करंडे, बापू चोर, सोसायटी संचालक डॉ. जाधव, हरिभाऊ तोडमल, उत्तम पठारे, गणेश शिंदे, शाम लांडगे यांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी देहरे ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते

## पिकात जनावरे गेल्याच्या कारणावरुन मारहाण

नगर – शेतातील पिकात जनावरे गेल्याच्या कारणावरुन सुरु झालेल्या वादाचे पर्यवसान हाणामारीत होऊन त्यात दोघे भाऊ जखमी झाले. ही घटना शेंडी शिवारातील देठेवस्ती येथे १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता घडली. या प्रकरणी तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत उमेश रमेश देठे (वय २५, रा. देठेवस्ती, शेंडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा चुलत भाऊ राजू देठे यांच्या गोठ्यातील जनावरे शेतात गेल्याच्या कारणावरुन संदेश मनोज देठे, मनोज मुक्ताजी देठे व विनोद मुक्ताजी देठे (सर्व रा. देठेवस्ती, शेंडी) यांच्याशी सुरुवातीला वाद झाला. त्यानंतर तिघानी राजू देठे यास लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण केली. हे भांडण सुरु असताना फिर्यादी हे भांडण सोडवण्यासाठी मध्ये गेले असता तिघांनी फिर्यादी यांनाही लाथाबुक्यांनी व लाकडी दांडक्यांनी मारहाण करत शिवीगाळ आणि दमदाटी केली.या हाणामारीत राजू देठे व उमेश देठे दोघे जखमी झाले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात उमेश देठे त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ (३) (५), ३५१(२) प्रमाणे मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास पोलीस नाईक विष्णु भागवत हे करीत आहेत.

## अनुसया हजारे यांचे वृद्धपकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी अनुसया लक्ष्मण हजारे (वय ८५) यांचे ११ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हरिभाऊ हजारे यांच्या त्या मातोश्री होत.

# कंत्राटदारांचे थकित देयके अदा करा; अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकणार

### अधिक्षक अभियंत्यांच्या खुर्चीला फुलांचा हार घालून बिल्डर असोसिएशनचा निषेध

नगर – कंत्राटदार ठेकेदारांच्या थकित देयकांच्या तातडीने मंजुरीसाठी बिल्डर असोसिएशनच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांच्या खुर्चीला फुलांचा हार घालून निवेदन चिकटविण्यात आले व निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष संजय गुंदेचा, उपाध्यक्ष राहुल शिंदे, सचिव बाळासाहेब मुरदारे, सहसचिव विष्णू तवले, उदय मुंडे, प्रितम भंडारी, संजय डोके, भाऊसाहेब सोनवणे, ईश्वर जंजिरे, महेश वाकचौरे, संजय फुंदे, शैलेश मेहेर, रमेश तोरडमल, रामचंद्र रेपाळे, श्रीकांत दराडे, किरण पागिरे, देवेंद्र गुंड, सोमनाथ शेटे, महेश गायकवाड, निलेश रोकडे, ज्ञानदेव नजन व आंदोलनासाठी संगमनेरहून आलेले सभासद व पदाधिकारी एन के गाडे, रामदास कल्हापुरे, एस पी गोडसे, संकेत काकडे, हर्षल काढाणे आदी उपस्थित होते.



कंत्राटदार ठेकेदारांच्या थकित देयकांच्या तातडीने मंजुरीसाठी बिल्डर असोसिएशनच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांच्या खुर्चीला फुलांचा हार घालून निवेदन चिकटवून निषेध व्यक्त करण्यात आला.

निवेदनात नमूद करण्यात आले की, विविध योजनांच्या निधीबाबत यापूर्वीही अनेक आंदोलने व निवेदने देण्यात आली; मात्र सरकारकडून ठोस उपाययोजना झालेली नाही. मार्च २०२५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारांना फक्त ७ टक्के निधी वितरित केला होता, त्यानंतर अद्याप कोणताही निधी मिळालेला नाही.

संघटनेने वारंवार मागणी केली आहे की, मागील देयके पूर्ण केल्याशिवाय नवीन निविदा काढू नयेत, तसेच प्रलंबित देयकासाठी शासनाकडून ५ ते १० दिवसांत निधी उपलब्ध करून द्यावा. अन्यथा विभागाच्या कार्यालया बाहेर धरणे आंदोलन करण्यात येईल, असे लेखी कळविण्यात आले होते. मात्र या पत्राची दखल न घेता कार्यालयात अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करण्यात आला. ठेकेदारांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून, त्वरित निधी मंजूर करून थकित देयके अदा न केल्यास कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला.

# गृहिणी

## आरोग्य

* रक्तातील साखर नियंत्रित राखण्याचे काम बोर करते. अ जीवनसत्व असल्यामुळे नियमित बोर खाल्ल्यास पचनशक्ती सुधारते. बोर वजन कमी करण्यासही मदत करते. त्वचेचे तारुण्य टिकवण्यासाठी या फळाची मदत होते. एक चमचा बोराचा रस आणि काळी मिरी याचे सेवन केल्यास सर्दीपासून बचाव होतो. बोर खाल्ल्याने प्रतिकारशक्ती वाढते. हे फळ खाल्ल्यास ताण हलका होतो. यात भरपूर प्रमाणात क जीवनसत्व आहे.

## पाककला

### स्प्राउट चाट

**साहित्य** – २ चमचे तेल, १ चमचा हिरव्या मिरचीची पेस्ट, १ कप मोड आलेले मूग, अर्धी वाटी मोड आलेले चणे, अर्धा तास पाण्यात भिजलेले पाव कप शेंगदाणे, पाव कप बारीक चिरलेला कांदा, अर्धा कप बारीक चिरलेले पत्ताकोबी, पाव कप किसलेले गाजर, पाव कप बारिक चिरलेली कोथिंबीर, लिंबाचा रस, मीठ, साखर, चाट मसाला, जिरे व काळे मिरेपूड चवीनुसार.

**कृति** – तेल गरम करून त्यात हिरव्या मिरचीची पेस्ट घालून परतून घ्यावे. नंतर त्यात मूग, चणे आणि थोडेसे मीठ घालून चांगल्या प्रकारे परतून २–३ मिनिटे झाकण ठेवावे. हे मिश्रण थंड झाल्यावर त्यात बाकी उरलेले साहित्य टाकावे. या चाटमध्ये द्राक्ष, डाळिंब किंवा संत्र्यासारखी फळेसुद्धा घालू शकता.

## सल्ला

* माणूस दर मिनिटाला किमान दहा वेळा पापण्यांची उघडझाप करतो. डोळ्यांच्या स्नायुंद्वारे आपल्या पापण्या हालचाल करीत राहतात. डोळ्यांवर पापण्यांखाली अश्रूग्रंथी असतात. जेव्हा पापण्या हालचाल करतात तेव्हा जलकणांचा स्राव होऊन डोळ्यात पसरत राहतो. त्यामुळे डोळे ओले पडतात. डोळ्यांच्या आरोग्यासाठी त्या ओल्या राहणे अत्यंत गरजेचे असते.

* पाय मुरगळल्यावर गरम पाण्यात मीठ घालून पाय बुडवून ठेवावा.

## सौंदर्य

* चेहऱ्यावर उष्णता व जळजळ जाणवत असेल तर पुदिन्याची पाने वाटून त्यात गुलाब पाणी टाका व २० मिनिटे चेहऱ्यावर लावून धुवा. चेहऱ्याला गारवा मिळेल.

* २५ मिली ग्लिसरीन व २५ मिली शुद्ध गुलाबपाणी एकत्र मिसळून त्यात ५ ग्रॅम सल्फर पावडर मिसळा. हा लेप रात्री चेहऱ्याच्या डाग–मुरमांवर लावून ठेवा. सकाळी चेहरा पाण्याने धुवा. या लेपामुळे आठवडाभरातच ॲक्नेच्या समस्येतून आपली सुटका होईल. उत्तम रिझल्ट मिळवण्यासाठी आठवड्यातून ३ वेळा हा लेप लावा. जर आपण संगणकावर ८ तास काम करत असाल तर डोळ्यावर पाण्याचा शिडकावा दर १ तासाने मारावा.

## वास्तू

* घराचा नैर्ऋत्य कोपरा नेहमी वस्तूंनी भरलेला असला पाहिजे. येथे जास्त रिकामी जागा सोडू नये, अशा प्रकारच्या भूखंडाच्या चारी बाजूंनी रिकामी जागा सोडली पाहिजे.

* दक्षिणेस असलेल्या कपाटात खूप सामान असेल; परंतु रोकड आणि दागिने मात्र कमी असतील, तर ते कपाटाच्या वरच्या खणात ठेवावेत. खटला किंवा कर्जासारख्या वादग्रस्त विषयांचे दस्तऐवज या दिशेच्या कपाटात ठेवणे कटाक्षाने टाळावे. त्यासाठी पूर्वेकडील किंवा उत्तर–पुर्वेकडील कपाट सर्वोत्तम होय.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, उ.भा.१०|३३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : काही अडचणींनंतर यश मिळेल. व्यापार व्यवसायात स्थिती नरम–गरम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मिथुन** : कौटुंबिक विषयांमध्ये काळजी घ्या. नोकरदार व्यक्तींनी कार्यात सावधगिरी बाळगावी. महत्वाकांक्षा पूर्ण झाल्यामुळे आनंद वाटेल.

**कर्क** : आपल्या कौटुंबिक तणावांचा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होऊ देऊ नका. नोकरीपेशा व्यक्तींसाठी कामात स्थिती सुखदायक राहील. व्यापार–व्यवसायात आर्थिक लाभ मिळेल.

**सिंह** : यथायोग्य विचार करून कामे करा. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील. काही महत्वपूर्ण प्रश्नांची सोडवणूक होण्याची शक्यता आहे. शत्रू वर्ग पराभूत होईल.

**कन्या** : बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील.

**तूळ** : दिवस चांगला आहे. आपल्या छान वागण्याने इतरांना हवेहवेसे वाटू शकता. शेयरच्या विषयामध्ये सावधगिरी बाळगा.

**वृश्चिक** : मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता. पत्नी व मुलांचा सहवास लाभेल.

**धनु** : मानसिक सुख–शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.

**मकर** : आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. केव्हातरी एखाद्या सामाजिक समारंभात आपल्या विचारांचा परिणाम होईल.


**कुंभ** : महत्वाच्या बातम्या मिळाल्याने आपण एक सुखद परिस्थितीत आपणास बघाल. पत्नी व मुलांचा सहवास लाभेल.

**मीन** : जवळच्या नात्याचा आनंद घेण्यावर आपले चित्त एकाग्र करा. स्वार्थी बनू नका. दिवस आनंदात जाईल. व्यापारिक करार व व्यवहारात सावधगिरी बाळगा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२४१

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२४० चे उत्तर



**आडवे शब्द** : १) काजळ; सुरमा ५) ढीग; रास; चवड ७) चलाख; ताजातवाना; हुशार ९) खडतर व्रत; बारा वर्षांचा काळ १०) मग्न; लीन; रममाण; गुंग १२) शिकार १४) काशीचे दुसरे नाव; बनारस १५) ओकारी; उलटी; वांती १७) वर्षाच्या बोलीने ठेवलेला नोकर १८) ऊब; धग २०) एक वृक्ष ज्याच्यापासून तेलही निर्माण होते २१) लंकेचा दहातोंडी राजा २२) अहमदनगर जिल्ह्यातील एक तालुका

**उभे शब्द** : १) लग्नात अक्षता टाकताना वधुवराच्या धरतात ते कापड २) अटीची भाषा ३) वाकलेला; झुकलेला ४) खेद; खिन्नता; उत्कंठा; किळस ५) पीकवाढीसाठीचा एक घटक ६) शिपाई; पट्टेवाला ८) पद्धत; चाल; तऱ्हा; रिवाज ११) वेगाने वाहणारी हवा १३) बर्फामुळे पांढरा दिसतो म्हणून हिमालयाला असेही नाव मिळाले १४) शेपटी असलेला काळ्या तोंडाचा एक प्राणी १६) माकडाचा खेळ करणारा; जादूगार; डोंबारी १७) वर्ष; शक; झाडाची त्वचा १८) एक शेंग व तिचे झाड १९) दया; करुणा; परमावधी २०) जोपासना; काळजी २१) पुरुषाच्या नावापुढे लावतात तो शब्द

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : गर्वाने देव दानव बनतात, तर नम्रतेमुळे मानव देव बनतो.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## आपण बोलतो कसे?

लहानपणापासून आपण बोलत असतो, बोललेले ऐकत असतो. हे इतक्या सवयीचे झालेले असते, की आपण काही विशेष वेगळी क्रिया करत आहोत, हे जाणवतही नाही; पण ज्यावेळेस आवाज बसतो त्यावेळेस बोलण्याची क्रिया कशी होत असेल, असा प्रश्न नक्कीच तुम्हाला पडला असेल. आवाजाच्या निर्मितीत पोटाचे स्नायू, छाती व पोट यांच्यामधील पडदा, फुफ्फुस, स्वरयंत्र, घसा, नाक, तोंड या अवयवांचा सहभाग असतो. यातही स्वरयंत्रांचे काम महत्त्वाचे असते. उत्क्रांतीमध्ये स्वरयंत्राचा विकास होऊन बोलणे हे कार्य मानवात स्वरयंत्र करू लागले. बोलण्याच्या क्रियेत सर्वप्रथम मेंदूतील वाचाकेंद्रातून आज्ञा येते. त्यानुसार स्वरयंत्राची स्वरतंतूची हालचाल होऊन आपण बोलावयास लागतो. फुफ्फुसातील हवेचा वापर यासाठी केला जातो. तसेच वर सांगितल्याप्रमाणे घसा, टाळू, दात, ओठ, नाक व जिभेच्या सहाय्याने वेगवेगळ्या शब्दांची निर्मिती केली जाते. जसे कंठ्य शब्द क, ख, ग. इ; तालव्य शब्द ट, ठ, ड; दंत्य शब्द त, थ, द; ओष्ठ्य शब्द प, फ आणि अनुनासिक शब्द ञ वगैरे. अशा प्रकारे आपण बोलतो. वरीलपैकी कशात बिघाड झाला, म्हणजे वाचाकेंद्र, आज्ञावहन करणारे चेतातंतू, स्वरयंत्रातील स्वरतंतू आणि घसा, जीभ वगैरे अवयव यात बिघाड झाल्यास वा या ठिकाणी व्याधी झाल्यास बोलण्याच्या प्रक्रियेत अडथळा येऊन आवाज पूर्ण बंद होणे, अडखळत बोलणे अशी लक्षणे निर्माण होतात.

## तह

एकदा लांडगे आणि बोकड यांच्यात हद्दीवरून वाद झाला. भांडता–भांडता त्याचे लढाईत रूपांतर झाले. ते एकमेकांवर तुटून पडले. बरेच दिवस लढाई चालली, तरी कोणी कोणास हार जाईना. खरे तर लांडग्यांनी बोकडांचा कधीच फडशा पाडला असता; परंतु बोकडांच्या बाजूला असलेल्या लढाऊ कुत्र्यांपुढे लांडगे हतबल झाले.

शेवटी दोन्ही बाजूंनी तह करण्याचे ठरविले. तहात असे ठरले की, लांडग्यांनी आपली मुलं बोकडांच्या ताब्यात द्यावीत आणि बोकडांनी आपले कुत्रे लांडग्यांच्या स्वाधीन करावेत. मग याप्रमाणे अटी अंमलात येताच दोन्ही पक्ष आपापल्या हद्दीत जाऊन बसले. इकडे लांडग्यांनी दुष्टावा एकून एकेका कुत्र्याला गुपचूपपणे ठार केले; तर तिकडे बोकडांच्या ताब्यात असलेली लांडग्यांची मुले भूक लागताच मोठमोठ्यानं शंख करू लागली. मुलांचे रडणे ऐकून लांडगे धावून आले आणि बोकडांना म्हणाले, ''किती अधम आहात रे? आमच्या मुलांना मारून तुम्ही तहाच्या अटी पायदळी तुडवून तहाचा भंग केला. आता व्हा युद्धाला तयार!'' असे म्हणत लांडगे बोकडसेनेवर तुटून पडले. बोकडांच्या बाजूला कुत्र्याची सेना नसल्यामुळे थोड्याच वेळात बोकाडंचा पराभव होऊन ते सर्व ठार झाले.

**तात्पर्य** : शत्रूशी मैत्री करताना आपल्या सुरक्षिततेची साधने त्यांच्या ताब्यात कधीही देऊ नयेत.

# जीवन का अमृत (भाग १)



सूरत–शब्द योग के महापुरुषों ने हम पर बहुत बड़ी कृपा की हुई है। नामदान के समय ही वे जिज्ञासु की सुरत अथवा ध्यान को आज्ञाचक्र पर ले आते हैं और उनका नूरी स्वरूप शिष्य के अंग–संग हो जाता है। शिष्य को एकाग्रता का अभ्यास करना होता है, जिसमें गुरु–शक्ति मददगार होती है। आज्ञाचक्र पर सुरत के एकाग्र होते ही सत्गुरु शिष्य की सुरत को अपनी गोद में ले लेता है। यहाँ आकर शिष्य का काम सम्पूर्ण हो जाता है। गुरुस्वरूप फिर शिष्य की सुरत को आध्यात्मिक मंडलों को पार कराता हुआ तब तक चैन नहीं लेता, जब तक कि उसे सत्पुरुष की गोद में लीन नहीं करा देता। ध्यान की एकाग्रता प्राप्त करने में केवल शब्द का अभ्यास मददगार है, अन्य साधन नहीं।

इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज एक आम इंसान की तरह परमात्मा से प्रार्थना कर रहे हैं कि हे परम पिता! आप मुझे बताइए कि मुझ में कैसे गुण हों, ताकि मैं आपके दर्शन कर सकूँ। जब भी इंसान के अंदर

## गुरू और परमात्मा

एक ख्वाहिश, कशिश पैदा होती है कि वह प्रभु से मिले, तो उसकी आत्मा से एक पुकार उठती है। गुरु अर्जनदेव जी महाराज हमें उस अवस्था की बात समझा रहे हैं, जब इंसान बौद्धिक स्तर पर अपने आपको प्रभु का अंग समझता है, उसे मालूम हो जाता है कि उसकी संभाल करनेवाला कोई है! उसे यह अहसास हो जाता है कि दुनिया में प्रभु के सिवाय उसका कोई नहीं है, जो उसकी मदद कर सके। उसके दोस्त, रिश्तेदार, संबंधी चंद दिनों तक उसके साथ रह सकते हैं, सदा के साथी नहीं बन सकते। जब हमें किसी प्रभु रूप महापुरुष की सोहबत मिलती है, तो वे हमें अपनी गोद में बैठाकर निजधाम ले जाते हैं। इस दुनिया में सबसे ज़्यादा प्यार माँ–बाप अपने बच्चों से करते हैं। माँ और बच्चे के प्यार को सबसे पवित्र और गहरा माना गया है। परमात्मा सभी को बनाने वाला है। जब बच्चा माँ के गर्भ में होता है, तो उसकी संभाल प्रभु ही करता है। माँ के शरीर में बच्चे के लिए दूध परमात्मा ही लाता है। यह सब प्रभु की देन है। प्रभु सबसे प्यार करता है। जो कोई भी इस धरा पर आता है, उसके लिए प्रभु पहले से ही प्रबन्ध कर देते हैं। जब आग जलती है, तो ऑक्सीजन ख़ुद–ब–ख़ुद मदद के लिए आ जाती है। हमें सांस लेने के लिए ऑक्सीजन और नाइट्रोजन का mixture (मिश्रण) चाहिए, जिसका atmosphere (वायुमंडल) में प्रभु ने प्रबन्ध किया हुआ है। यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज समझा रहे हैं :

**कवन गुन प्रान पति मिलउ मेरी माई ।।**

हे प्रभु ! मुझे कौन सा गुण अपने आप में लाना है ? मेरे परमेश्वर, मेरे माता–पिता आप मुझसे मिलिए, किसी भी तरीके से मिलिए। मैं अपने आपको किस अवस्था में पहुँचाऊँ, यह आप मुझे समझा दीजिए।

इस दुनिया में इतना भटकाव है कि हम उसमें गुम हो जाते हैं और व्यर्थ के कार्यों में लगे रहते हैं। कुछ लोग अपने परिवार के पालन–पोषण में ही लगे रहते हैं तो कुछ मकान–जायदाद बनाने में। हर इंसान किसी न किसी कार्य में व्यस्त रहता है और जिंदगी यूँ ही चलती रहती है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

१५. आप ब्राह्मण आत्मायें पुरुषोत्तम आत्मायें हो। प्रकृति पुरुषोत्तम आत्माओं की दासी है। अभी आप न सिर्फ आत्माओं का परिवर्तन करते हो लेकिन प्रकृति का भी परिवर्तन करते हो। जितनाजितना आपके शक्तिशाली सतोप्रधान वायब्रेशन होंगे उतना प्रकृति और मनुष्यात्माओं की वृत्ति दोनों ही चेंज हो जायेंगी। मनुष्यात्माओं को वृत्ति से चेंज करना है और प्रकृति को वायब्रेशन द्वारा परिवर्तन करना है। तो परिवर्तन करनेवालों की वृत्ति सदा ही शक्तिशाली चाहिए, साधारण नहीं।

१६. आपकी पवित्र दृष्टि से विश्व की आत्मायें और प्रकृति दोनों पवित्र बन रही हैं। आपकी दृष्टि से सृष्टि बदल रही है। आपके श्रेष्ठ कर्मों से श्रेष्ठाचारी दुनिया बन रही है।

१७. आप बच्चे याद के बल से विश्व को परिवर्तन करते हो। याद माना शान्ति की शक्ति, इससे व्यक्ति भी बदल जायेंगे तो प्रकृति भी बदल जायेगी। तो व्यक्तियों को भी बदलना है और साथ में प्रकृति को भी बदलना है। प्रकृति को मुख का कोर्स तो नहीं करायेंगे। व्यक्तियों को तो कोर्स करा देते हो लेकिन प्रकृति को योगबल से ही बदलेंगे।

## आज्ञा चक्र

१८. आपके अन्दर सिर्फ एक ही संकल्प हो 'बाप और आप' इसी को ही योग कहते हैं। जब पॉवरफुल योग में बैठेंगे तब और सब संकल्प शान्त हो जायेंगे। बाप के मिलन की अनुभूति के सिवाय और सब संकल्प समा जायेंगे। संकल्पों का विस्तार न हो, स्टॉप कहो और स्टॉप हो जाएं, फल ब्रेक लगे। ऐसी कन्ट्रोलिंग पावर हो।

१९. आपकी भावना का फल विश्व की आत्माओं को परिवर्तन कर रहा है और आगे चल प्रकृति सहित परिवर्तन हो जायेगा। आप आत्माओं की श्रेष्ठ भावना इतना श्रेष्ठ फल प्राप्त कराने वाली हो।

२०. आप अपनी शुभ भावना का महत्व जानते हो, अपनी शुभभावना को साधारण रीति से कार्य में लगाते चल रहे हो वा महत्व जानकर चलते हो? दुनियावाले भी शुभ भावना शब्द कहते हैं।

लेकिन आपकी शुभ भावना सिर्फ शुभ नहीं लेकिन शक्तिशाली भी है क्योंकि आप संगमयुगी श्रेष्ठ आत्माएं हो, संगमयुग को ड्रामा अनुसार प्रत्यक्ष फल प्राप्त होने का वरदान है। सिर्फ इसके महत्व को जानकर इसका प्रयोग करो।

२१. जैसे सायन्स के साधन दूर बैठे आत्माओं से समीप का सम्बन्ध कराने के निमित्त बन जाते हैं, आपकी आवाज पहुंच जाती है, आपका संदेश पहुंच जाता है, दृश्य पहुंच जाता है। तो जब सायन्स की शक्ति अल्पकाल के लिए समीपता का फल दे सकती है तो आपके साइलेन्स की शक्तिशाली शुभ भावना दूर बैठे भी फल नहीं देगी! सिर्फ इसके लिए शान्ति की शक्ति जमा करो।

२२. शुभ भावना अर्थात् शक्तिशाली संकल्प। सब शक्तियों से संकल्प की गति तीव्र है। जितने भी सायन्सने तीव्रगति के साधन बनाये हैं, उन सबसे तीव्रगति संकल्प की है। तो आप मास्टर विश्व कल्याणकारी आत्माओं की यह सूक्ष्म मन्सा सेवा प्रत्यक्ष रूप में अनुभव करायेगी, इससे समय भी कम और साधन भी कम, सम्पत्ति भी कम लगेगी। इसके लिए सिर्फ मन और बुद्धि सदा फ्री चाहिए। विशेष अटेन्शन हो एकांत और एकाग्रता।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

एक शाळेत जाणारा मुलगा : आई आजकाल प्रेमाचा व्हायरस सगळीकडे पसरलाय त्याची मला पण लागण झालीय.

आई : बाळा काळजी करु नकोस माझ्याकडे चप्पल नावाचा अँन्टीव्हायरस आहे तो काम करेल.

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतीय असंतोषाचे जनक?

– लोकमान्य टिळक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

**अ) सर्वग्रह** : संपूर्ण आहाराचा एकत्रित विचार करून तो किती प्रमाणात असावा, याबद्दलची माहिती म्हणजे सर्वग्रह होय. अर्थात जेवताना आहार किती प्रमाणात घ्यावा, हे सर्वग्रहमधून समजते. बैठे काम करणाऱ्यांचा आहार कमी प्रमाणात असावा, तर कष्टाची कामे करणाऱ्यांचा आहार जास्त प्रमाणात असावा. म्हणून प्रत्येकाने स्वतःची प्रकृती, वय, कामाचे स्वरूप व आहार पचविण्याची क्षमता यांचा विचार करूनच आहार घ्यावा. एकच आहाराचा नियम सर्वांना लागू होणार नाही. तरी साधारणतः आमाशयाचे (Stomach) चार भाग करून त्यातील दोन भाग आहारीय अन्नपदार्थ, एक भाग पाणी, तर एक भाग हवेसाठी रिकामा ठेवावा. अशा पद्धतीने घेतलेला आहार आरोग्याचे रक्षण करतो, तर तडस लागेपर्यंत जेवण केले, तर त्यातून नक्कीच व्याधीनिर्मिती होते. **ब) परिग्रह** : परिग्रह म्हणजे आहारातील प्रत्येक पदार्थाची मात्रा ठरविणे होय.

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**उदाहरणार्थ** : जर पदार्थ पचावयास जड असेल, तर त्याचे प्रमाण आहारात कमी असावे. जे पदार्थ पचावयास हलके आहेत असे पदार्थ आहारात भरपूर घ्यावेत.

**उदाहरणार्थ** : पुरणपोळी, बासुंदी हे पदार्थ पचावयास जड असल्याकारणाने प्रत्येकाने ते कमी खावेत. तर गरम सूप, पेज, हे पदार्थ पचावयास हलके असल्याने ते जास्त प्रमाणात खावेत.

देश म्हणजे स्थान याचा विचार दोन प्रकारे करावा लागतो. एक म्हणजे आहारीय पदार्थ ज्या ठिकाणी उत्पन्न झाले ते स्थान व दुसरे म्हणजे तो पदार्थ कोठे सेवन केला जातो, अर्थात खाल्ला जातो ते स्थान.

देशभेदानुसार हवामान, पाण्याचे प्रमाण, जमिनीचा कस बदलत असल्याने विशिष्ट देशात, विशिष्ट प्रकारचे धान्य उत्तम प्रकारे तयार होते. तेच धान्य दुसऱ्या देशात, हवामानात तयार केल्यास निकृष्ट दर्जाचे तयार होते. उदाहरणार्थ : पंजाबातील गहू, केरळ–कोकणातील तांदूळ, सिमल्याची सफरचंदे ही उत्तम दर्जाची असल्याकारणाने आरोग्याच्या दृष्टीने शरीराचे उत्तम पोषण करतात. परंतु महाराष्ट्रातील गहू हा पंजाबपेक्षा निकृष्ट दर्जाचा असल्याने शरीराचे पोषण निकृष्ट दर्जाचे होते. आहारातील पदार्थ जेथे तयार होतो, त्याच भागात तो शरीरास पोषक ठरतो. तोच पदार्थ दुसरीकडे त्रासदायक ठरू शकतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# केंद्रीय निवडणूक आयोगा विरोधातील खा. राहुल गांधी यांची पत्रकार परिषद दिल्लीगेट चौकात एलइडी स्क्रीनवर दाखवली

नगर – शहरातील दिल्लीगेट चौकात एलईडी व्हॅनच्या माध्यमातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध घेतलेली पत्रकार परिषद सोमवारी सायंकाळी शहर जिल्हाप्रमुख दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रदर्शित करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना केंद्रीय निवडणूक आयोगाचा भांडाफोड करणारी ही राहुल गांधी यांची पत्रकार परिषद जनतेला दाखवण्यासाठी प्रत्येक शहरात चौकाचौकात असे एल इ डी लावण्याचे कळवण्यात आले होते. दीप चव्हाण यांना हे हर्षवर्धन सपकाळ यांचे आदेश पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी याची व्यवस्था केली. लोकसभेत अवघ्या २५ जास्तीच्या जागा मिळवून थोडक्या बहुमताच्या मोदी सरकार देशावर हुकूमशाही पद्धतीने राज्य करीत असून मनमानी कारभार करीत आहे.

लोकसभेची निवडणूक लढविताना केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सहकार्याने भाजपने मतदार याद्यामध्ये फेरफार करून प्रत्येक विधानसभा मतदार संघात ३० – ३० हजार मते बोगस नोंदवली. आता ३० हजाराच्या पुढे भाजपा उमेदवाराने मते मोजली. तरीदेखील अनेक मतदार संघात फार थोड्या निसटत्या फरकाने महाविकास आघाडीचे उमेदवार पराभूत झाले. याचा अर्थ सरळ आहे की भाजपा मित्र पक्षांच्या उमेदवाराला बोगस मतांचा फायदा मिळाला नसता तर ते नक्की पराभूत झाले असते. अहिल्यानगर लोकसभा निवडणुकीत तेच घडले परंतु जनमताचा रेटाच इतका होता की भाजप उमेदवाराचा पराभव झाला.

### जनतेसमोर मांडला निवडणुकीतील बोगस मतदार याद्यांचा घोळ : काँग्रेसचा उपक्रम



दिल्लीगेट चौकात एलईडी व्हॅनच्या माध्यमातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध घेतलेली पत्रकार परिषद सोमवारी सायंकाळी शहर जिल्हाप्रमुख दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रदर्शित करण्यात आली.

आपल्या कडे विधानसभेला महायुतीच्या उमेदवाराला निवडून येण्यासाठी जंग जंग पछाडावे का लागले याचा विचार पुढच्या निवडणुकीत सामान्य मतदार करतील आणि जनाधार असलेला योग्य महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून देतील यात शंका नाही असे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

या कार्यक्रमात प्रा. बापू चंदनशिवे, बाळासाहेब भंडारी, श्याम वाघस्कर, मयूर पाटोळे, रिजवान शेख, फिरोज शेख, नलिनी गायकवाड, मनोज गुंदेचा, शम्स खान, रजनी ताठे, चंद्रकांत उजागरे, मोहसीन शेख, गणेश भोसले, अल्तमस जरीवाला, आनंद गारदे, अज्जू शेख, तारीक कुरेशी, अनिस चुडीवाला, फरीन शेख तसेच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



अ.ए.सो.चे. भिंगार नाईट स्कुलचा खेळाडू अमोल गायकवाड याची राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग (WRPF) स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करताना संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सदस्या सुनंदाताई भालेराव, शाळा समितीचे चेअरमन रविंद्र बाकलीवाल, मुख्याध्यापिका सौ. वाळुंजकर, कडुस सर. सानप सर, शिर्के सर आदि.

# अ. ए. सो. भिंगार नाईट स्कूलचा खेळाडू अमोल गायकवाड यांची पॉवरलिफ्टिंग क्रीडाप्रकारात चॅम्पियनशिप राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

नगर – पुणे (मुंडवा) येथे झालेल्या (WRPF) World Row Powerlifting Federation India ओपन सेंट्रल इंडिया पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप – २०२५ यांनी कारगील विजय दिन निमित्त घेतलेल्या स्पर्धेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भिंगार नाईट स्कूल, भिंगार मधील इ.९वीचा. खेळाडू विद्यार्थी अमोल प्रभाकर गायकवाड याने पाच वेगवेगळ्या प्रकार गटात SBD, पुशपुल, बेंचप्रेस, डेडलिफ्ट, स्क्वॅटस् यात भाग घेवुन ३ सुवर्णपदक, १ रौप्यपदक, १ कांस्यपदक असे एकुण ५ पदके व प्रमाणपत्र मिळवले आहे.

ही स्पर्धा २५ ते २७ जुलै रोजी झाल्या. त्याने पॉवरलिफ्टिंगमध्ये चॅम्पियनशिप मिळवली आहे.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, संस्थेच्या सदस्या सुनंदाताई भालेराव, शालेय समिती चेअरमन रविंद्र बाकलीवाल, मुख्याध्यापिका सौ. वाळुंजकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे तिरंगा रॅली

नगर – 'हर घर तिरंगा' तसेच 'आझादी का अमृत महोत्सव' अभियानामध्ये सहभागी होत श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नेप्ती गावामध्ये ११ ऑगस्ट रोजी तिरंगा रॅली काढली. ही मोहीम आझादी का अमृत महोत्सव चा भाग आहे, ज्याचा उद्देश लोकांना त्यांच्या देशाशी आणि राष्ट्रध्वजाशी भावनिक नाते जोडण्यास प्रवृत्त करणे आहे, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले.

नेप्ती गावामधून निघालेली ही रॅली 'हर घर तिरंगा' अशा घोषणा देत ग्रामपंचायत कार्यालयासमोरील मंदिरापासून सुरुवात करून जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात शालेय विद्यार्थ्यांबरोबर तसेच गावातील विविध भागांमध्ये राहणाऱ्या गावकऱ्यापर्यंत हर घर तिरंगा अभियानाची माहिती व महत्व विद्यार्थ्यांनी पोहोचवले. अशा या प्रसंगी नेप्ती गावचे सरपंच संजय जपकर तसेच ग्रामपंचायत सदस्य, गावकरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेप्ती येथील मुख्याध्यापिका मांडगे मॅडम, कारले सर आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिरंगा रॅली मध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

### हर घर तिरंगा अभियानाला नेप्ती गावामध्ये सुरुवात



छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयाने नेप्ती गावात तिरंगा रॅली काढली होती.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. अमेय कुलकर्णी आदींनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई अ‍ॅण्ड टी सी विभाग प्रमुख), प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख), प्रा. बी. एन. खरड (रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन विभाग प्रमुख, प्रा. पी. आर. मुटकुळे (ए आय एम एल विभागप्रमुख) यांच्यासमवेत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे प्रोत्साहन विद्यार्थ्यांना मिळाले.

# वरिष्ठ महिला महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेत अहिल्यानगर फूटबॉल संघाची विजयी घौडदौड

### मुलींच्या संघाची उत्कृष्ट कामगिरी

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याचा वरिष्ठ महिलांचा संघ पालघर येथे सुरु झालेल्या वरिष्ठ महिला महाराष्ट्र राज्य फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी झाला आहे. सातारा बरोबर झालेल्या सामन्यात अहिल्यानगरच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करुन दणदणीत विजय संपादन केला. ६–१ गोलने अहिल्यानगरचा संघ विजयी ठरला.



वरिष्ठ महिला महाराष्ट्र राज्य फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत विजयी घौडदौड करताना अहिल्यानगर संघ.

१६ ऑगस्ट पर्यंत ही फुटबॉल स्पर्धा सुरु असून, अहिल्यानगरच्या संघाने आगेकुच केली आहे. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांचे सक्षम संघ आपापले कौशल्य सादर करत आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ देखील उत्तम तयारीसह या स्पर्धेत उतरला आहे. जिल्हा संघाची निवड जिल्हास्तरीय निवड चाचण्यांद्वारे करण्यात आली असून, खेळाडूंनी गेल्या काही आठवड्यांपासून सराव सत्रात भाग घेतला होता.

अहिल्यानगर संघात राणी कदम (कर्णधार), सोनिया दोसाणी, प्रियांका आवारे, सुर्यनयना, श्रेया कावरे, पूजा भिंगारदिवे, महिमा पाथरे, आयेशा सय्यद, वैष्णवी रोकडे, तनिषा शिरसुल, सुमैय्या शेख, निकिता भिंगारदिवे यांचा समावेश आहे. संघ प्रशिक्षक म्हणून शशांक वाल्मिकी व संघ व्यवस्थापक म्हणून काजल वाल्मिकी काम पाहत आहे.

अहिल्यानगर संघाने मिळवलेल्या विजयाबद्दल जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंग मिन्हास, अमरजितसिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# इन्फिनिटी शूटिंग रेंज येथे शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धा उत्साहात

नगर – जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर मनपा, अहिल्यानगर शूटिंग स्पोर्ट असोसिएशन, इन्फिनिटी स्पोर्ट क्लबच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. नगर – पाथर्डी रोडवरील इन्फिनिटी शूटिंग रेंज येथे सदर स्पर्धा पार पडली. स्पर्धेत विविध शाळांतील मुले, मुली सहभागी झाले होते. स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात पार पडले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी व प्रशिक्षक प्रियंका खिंडारे, बांधकाम व्यावसायिक श्रेणिक मुनोत, मनपा क्रीडा अधिकारी व्हिन्सेंट फिलिप्स, अहमदनगर शूटींग असोसिएशनचे अध्यक्ष छबुराव काळे, गणेश कोरडे, सागर निमसे, सागर फाटके आदी उपस्थित होते.



इन्फिनिटी शूटिंग रेंज येथे शालेय जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये सहभागी झालेले खेळाडू.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – १४ वर्षाखालील पीएसआर मुले – प्रथम – पृथ्वीराज देशमुख (सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूल), द्वितीय – प्रथमेश गदादे (रेसिडेन्शिअल हायस्कूल), तृतीय – समर्थ मार्कंडे (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१७ वर्षांखालील पीएसआर मुले – प्रथम – साईराज बागूल (भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल), द्वितीय – आयुष काळे(पोदार इंटरनॅशनल स्कूल), तृतीय – चैतन्य गंधाडे (सेंट सेविअर स्कूल).

१९ वर्षांखालील पीएसआर मुले – प्रथम – गौरव घोडके (पेमराज सारडा कॉलेज), द्वितीय – ओम जाधव (श्रीकांत पेमराज गुगळे स्कूल), तृतीय – पार्थ छाजेड (पेमराज सारडा कॉलेज).

१४ वर्षाखालील पीएसआर मुली– प्रथम – पंकजा आरोळे, द्वितीय – कार्तिकी कोकाटे, तृतीय – मानसी वाबळे (भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल).

१७ वर्षाखालील पीएसआर मुली– प्रथम – राजनंदिनी काळे, द्वितीय – ऋतुजा गायकवाड (न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज), प्रिन्सी गांधी (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१९ वर्षाखालील पीएसआर मुली– प्रथम –वैभवी कदम (श्रीरामकृष्ण एज्युकेशन), द्वितीय – प्रणल अलगडे (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१४ वर्षाखालील ओएसआर मुले– प्रथम –सुवर्णराज पटवेकर (रुपीबाई बोरा स्कूल).

१७ वर्षाखालील ओएसआर मुले– प्रथम –वरूण कोल्हे, द्वितीय – ओमकार मांडे (अहमदनगर कॉलेज), तृतीय – श्रवण राऊत.

१९ वर्षाखालील ओएसआर मुले– प्रथम –कार्तिक कोल्हे (न्यू आर्टस् कॉमर्स), द्वितीय – यश औटी (अहमदनगर कॉलेज), तृतीय – प्रतिक नागरगोजे (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१४ वर्षाखालील ओएसआर मुली– प्रथम –आदिती आलीचिले (कॉन्व्हेन्ट हायस्कूल).

१७ वर्षाखालील ओएसआर मुली– प्रथम –मुग्धा राजापुरे (भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल), द्वितीय – अनुष्का गुजर, तृतीय – तेजस्वी म्हस्के (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१९ वर्षाखालील ओएसआर मुली– प्रथम –अनुष्का जाधव (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१४ वर्षाखालील ए.पी. मुले– प्रथम – व्यंकटेश आव्हाड (श्री साई इंग्लिश स्कूल), द्वितीय – पार्थ शेरे (रूपीबाई बोरा स्कूल).

१७ वर्षाखालील ए.पी. मुले– प्रथम – आदित्य बुचुडे (श्री साई इंग्लिश स्कूल), द्वितीय – अद्वय घायतडक (सेंट विवेकानंद), तृतीय – तन्मय वाघ (अहमदनगर कॉलेज).

१९ वर्षाखालील ए.पी. मुले– प्रथम – अथर्व पुंड (भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल), द्वितीय – युवराज ठाणगे, तृतीय – समर्थ देशमुख ( श्रीरामकृष्ण एज्युकेशन).

१७ वर्षाखालील ए.पी. मुली– प्रथम –श्रावणी भगत (श्री साई इंग्लिश स्कूल), द्वितीय – सिद्धी खुरांगे (कॉन्व्हेन्ट हायस्कूल), तृतीय – श्रुती ठाणगे (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

१९ वर्षाखालील ए.पी. मुली– प्रथम –मोनिका सूळ (रेसिडेन्शिअल हायस्कूल).

# जिल्हास्तरीय शालेय आयोजित रायफल शुटिंग स्पर्धेत नगरच्या राजनंदिनी काळेला सुवर्णपदक

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद अ. नगर मनपा व जिल्हा शुटिंग स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय १० मी. एअर रायफल शुटिंग १७ वर्षाखालील स्पर्धेत कु. राजनंदिनी काळे हिने प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत तिला २०० पैकी १९५ गुण मिळाले. यामुळे तिची पुढील महिन्यात होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, मनपा चे क्रीडा अधिकारी व्हिन्सेंट फिलिप्स, शूटिंग असोसिएशनचे अध्यक्ष छबुराव काळे, बांधकाम व्यावसायिक श्रेणीक मुनोत उपस्थित होते.

ती पेमराज सारडा महाविद्यालय येथे अकरावी कॉमर्स मध्ये शिकत असून तिला प्रा.संजय धोपावकर व प्रा. साठे सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. ती सध्या सेंट मोनिका येथील शूटिंग रेंजवर ऋषीकेश दरंदले यांच्या मार्गदर्शनात सराव करत आहे.

याबद्दल तिचे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, अनंत देसाई, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या माहेश्वरी गावित, तसेच इतर शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

### विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त

# नगरमध्ये १७ ऑगस्टला शास्त्रीय गायनाची मैफिल

नगर – श्रुती संगीत निकेतन, अहिल्यानगर आणि ओंकार आदिनाद फाऊंडेशन, पुणे या संस्थांच्या वतीने विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे शिष्य, ओंकार देऊळगांवकर, मकरंद खरवंडीकर, पवन नाईक आणि हृषिकेश गांगुर्डे यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता रावसाहेब पटवर्धन सभागृह सावेडी येथे आयोजित केली आहे.



विकास कशाळकर हे ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा घराण्याचे विख्यात गायक आणि गायन गुरू आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत शेकडो शिष्य तयार झाले आहेत. विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभरात देशात त्यांच्या शिष्यांच्या अनेक मैफली आयोजित करण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमात तबल्यावर शेखर दरवडे आणि हार्मोनियम वर डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांची साथसंगत लाभणार आहे. अनिकेत देऊळगावकर हे निवेदन करतील. सदर कार्यक्रम विनामूल्य असून या कार्यक्रमास गुरुजन, संगीत साधक आणि रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्षा डॉ.धनश्री खरवंडीकर आणि कार्यक्रमाचे समन्वयक परिमल कोल्हटकर यांनी केले आहे.

# संदीप रासकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

नगर – शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक संदीप रासकर यांना स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे होणाऱ्या तिसरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात पाहुण्यांच्या हस्ते रासकर यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली.



संदीप रासकर श्रीगोंदा तालुक्यातील येळपणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक आहे. त्यांनी जिल्हा परिषद शाळेत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचे काम केले आहे. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात नाव चमकवित आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागण्यासाठी त्यांनी आनंदी शाळा उपक्रम राबविला असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. रासकर हे कवी, वात्रटिकाकार आहेत. शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.नवनाथ राऊत यांना पी.एच.डी. पदवी प्रदान

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक नवनाथ धनाजी राऊत यांना इंदोर येथील ओरिएंटल विद्यापीठ येथुन कॅरॅक्टरीस्टीक्स इव्हॅल्युएशन ऑफ जिओपॉलीमर काँक्रिट बाय युजींग फायबर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीयल वेस्ट या विषयावर सिव्हील इंजिनीअरींग या क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. सदर अभ्यासक्रमात त्यांना इंदोर येथील ओरिएंटल विद्यापीठाचे सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग मधील डॉ.मनिष पाटकर यांचे मार्गदर्शन लाभले.



डॉ.राऊत यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ०३ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकूण ०१ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.



संविधान समर्थक समाज जोडो अभियान व पुनर्गठन कार्यक्रम अंतर्गत भिंगार वॉर्ड शाखेचे पुनर्गठन पंचशीलनगर बुद्ध विहार येथे उत्साहात पार पडले.

# भारतीय बौद्ध महासभेच्या भिंगार शाखेची कार्यकारणी जाहीर

### अध्यक्षपदी बौद्धाचार्य दिपक अमृत यांची नियुक्ती

नगर – भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने संविधान समर्थक समाज जोडो अभियान व पुनर्गठन कार्यक्रम अंतर्गत भिंगार वॉर्ड शाखेचे पुनर्गठन पंचशीलनगर बुद्ध विहार येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, कोषाध्यक्ष विजय हुसळे, संरक्षण सचिव गोरख केदारे, जिल्हा संघटक माधवराव चाबुकस्वार, बाबासाहेब धस, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस गौतम पाचारणे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, संस्कार उपाध्यक्ष लक्ष्मण माघाडे, संस्कार सचिव मिलिंद घाटेशाही, संघटक राजेंद्र पाडळे, एकनाथ भिंगारदिवे आदींसह परिसरातील उपासक उपस्थित होते.

भिंगार शहर वॉर्ड शाखेच्या अध्यक्षपदी बौद्धाचार्य दिपक अमृत यांची निवड करण्यात आली. नियुक्तीपत्र शहराध्यक्ष दिपक पाटोळे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे व कोषाध्यक्ष विजय हुसळे यांच्या हस्ते देण्यात आले. नवीन कार्यकारिणी खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आली–

अध्यक्ष : दिपक अमृत, उपाध्यक्ष : निलेश जाधव, सरचिटणीस : विकास चव्हाण, कोषाध्यक्ष : जनार्दन दिवे,

कार्यालयीन सचिव : प्रदीप कर्डक, संघटक : प्रशांत भिंगारदिवे, गौतम बनसोडे, तेजस पाखरे, सुरेश कदम, विजय शिंदे, पप्पू पाटोळे, सुदर्शन भिंगारदिवे.

# गरजूंना अल्प दरात दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळणे ही मानवसेवाच

## ॲड. विजय संकलेचा यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कॅन्सर तपासणी शिबिराला प्रतिसाद



आनंदऋषीजी म.सा.यांच्या जन्मजयंतीनिमित्त आनंदऋषीजी हॉस्पविटलमध्ये कॅन्सर तपासणी शिबिराचे उद्‌घाटन करताना विजय संकलेचा.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण खऱ्या अर्थाने आजच्या काळाची गरज आहे. गरजूंना वैद्यकीय सेवा माफक दरात किंवा मोफत उपलब्ध करून देणे ही सुध्दा एक मोठी मानवसेवाच आहे. जैन सोशल फेडरेशन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून असेच सेवाकार्य अविरतपणे करीत आहे. या कार्याचा जास्तीत जास्त लोकांना फायदा होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात येतात. अशा सेवाकार्याला हातभार लावण्याची संधी मिळणे हे सुध्दा भाग्यच आहे, असे प्रतिपादन विजय संकलेचा यांनी केले.

आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्मजयंतीनिमित्त आनंदऋषीजी हॉस्पविटलमध्ये कॅन्सर तपासणी शिबीर घेण्यात आले. शिबिराचे उद्‌घाटन दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी ॲड.विजय संकलेचा, राजेंद्र संकलेचा, संजय संकलेचा, निताताई संकलेचा, सिध्दार्थ संकलेचा, हितेशी संकलेचा, डॉ.मंजुश्री गिरी–साखला, डॉ.रवींद्र कुटे, शिबिरातील तज्ज्ञ डॉ.अनिकेत शिंदे, डॉ.भास्कर जाधव, डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.मितेश कटारिया, डॉ. सोनल सोलट, डॉ.मुकुंद उंडे, डॉ.सारिका झरेकर, डॉ.निखिता जैन (कटारिया), जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, संतोष बोथरा, माणकचंद कटारिया, डॉ. सुधा कांकरिया, प्रकाश छल्लानी, सुभाष मुनोत, डॉ.आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

डॉ. अनिकेत शिंदे म्हणाले, कॅन्सरवरील प्रभावी उपचार आता उपलब्ध झाले आहेत. हॉस्पिटलमध्ये घसा, फुफ्फुस, आतडे, तोंडाचा इत्यादी कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी, स्त्रियांमधील स्तनाच्या कॅन्सरची तपासणी मॅमोग्राफी मशिनव्दारे करण्यात येते. स्त्रियांच्या गर्भ पिशवीच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी शिबिरात करण्यात आली. कॅन्सरचे योग्य वेळी अचूक निदान झाल्यास प्रभावी उपचार करता येवू शकतात. शिबिरात ११५ रूग्णांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लानी यांनी आभार मानले.



## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा सन्मान

जयपूर राजभवनमध्ये राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ किसनराव बागडे यांना रक्षाबंधन कार्यक्रमात १४३ देशांमध्ये ध्यानधारणेचे प्रशिक्षण देत असलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या जयपूर येथील वैशालीनगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका बी के चंद्रकला दीदी यांनी राखी बांधली. यावेळी हरिभाऊ बागडे यांना निराकार परमपिता परमात्मा शिवबाबांची फ्रेम देऊन बी के चंद्रकला दीदी व १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक डॅा. दीपक हरके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी बी के जयंती दीदी, बी के एकता दीदी व बी के रतन भाई उपस्थित होते.



माणिक चौक येथील चाँद सुलताना हायस्कूलमध्ये नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

# आरोग्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक

## आबिद हुसेन यांचे प्रतिपादन; स्वातंत्र्य दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिरात ३७५ नागरिकांची मोफत तपासणी; चष्मे व औषधे वाटप

नगर – आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष केल्यामुळे गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. काही लोकांकडे वेळ नसतो, तर काहींकडे आर्थिक अडचणींमुळे तपासणी होत नाही. अशा परिस्थितीत मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर आधार ठरत आहे, असे प्रतिपादन आबिद हुसेन यांनी केले.

७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठान व थोरात सुपर स्पेशलिटी आय केअरच्या वतीने शहरात घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. या शिबिरात ३७५ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करुन गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

माणिक चौक येथील चाँद सुलताना हायस्कूलमध्ये झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आबिद हुसेन यांच्या हस्ते झाले. यावेळी मतीन खान, तन्वीर सय्यद, सद्दाम शेख, रिजवान शेख, मतीन शेख, शब्बीर खान, सईद खान, अल्ताफ लकडावाला, दिलावर शेख, अझहर काजी, अय्युब शेख, तन्वीर बागबान, मुबीन शेख, गनी राज, अकबर पैलवान आदी उपस्थित होते.

डॉ. प्रीती थोरात यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरात ओळखल्या गेलेल्या मोतीबिंदू आणि काचबिंदू रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. याशिवाय अनेक गरजूंना मोफत चष्मे व औषधे वितरित करण्यात आली. या शिबिरासाठी हाजी जावेद, अहमद जावेद, संजय भिंगारदिवे, निलेश महाजन, निलेश खरपूडे, मोईज आबेदिन, हाजी जावेद कुरेशी, हाजी नजीर कॉन्ट्रॅक्टर, असीर पठाण यांचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी थोरात सुपर स्पेशालिटी आय केअरच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मेडिसिनसोबत मेडिटेशनचीही गरज

## मंजू दीदी यांचे प्रतिपादन; राजयोगा मेडिटेशनद्वारे मन सकारात्मक करा; डॉक्टरांना आवाहन, हृदयविकार, तणावावर उपाय म्हणजे रोजचे मेडिटेशन



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय व मेडिकल विंग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात प्रथमच द जर्नी फ्रॉम मेडिसिन टू मेडिटेशन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – आज प्रत्येक व्यक्तीमध्ये होणारे भावनिक आणि नकारात्मक बदल समाजावर विपरीत परिणाम घडवतात. या कारणामुळे आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. समाजाला आज सर्वाधिक गरज आहे ती सकारात्मक भावनांची, आणि ती साध्य करण्यासाठी मेडिसिनसोबत मेडिटेशन अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन मंजू दीदी यांनी केले.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय व मेडिकल विंग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात प्रथमच द जर्नी फ्रॉम मेडिसिन टू मेडिटेशन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माउंट आबू (राजस्थान) येथील मंजू दीदी यांनी प्रमुख प्रवक्ते म्हणून उपस्थित होत्या.

ब्रह्माकुमारी विद्यालयात शिकवला जाणारा राजयोगा मेडिटेशन कोर्स मन परिवर्तन करून त्याला सकारात्मकतेकडे वळवतो, असे सांगून दीदींनी उपस्थितांना मेडिटेशनचे महत्त्व पटवून दिले. यावेळी सर्वांसोबत प्रत्यक्ष मेडिटेशनही करण्यात आले. तसेच, माउंट आबू येथे मेडिकल विंगतर्फे होणाऱ्या सेमिनारसाठी सर्वांना निमंत्रण दिले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित नोबल हॉस्पिटलचे डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी वाढत्या हृदयविकारामागील कारणांवर प्रकाश टाकला. सध्याची वाढती स्पर्धा, ईर्षा, तणाव आणि बदलती जीवनशैली ही गंभीर कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले. हृदयविकारापासून मुक्त होण्यासाठी दररोज मेडिटेशन करणे अत्यावश्यक असल्याचे सांगून सर्व डॉक्टरांना राजयोगा मेडिटेशन शिकण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगर सेवा केंद्राच्या मुख्य संचालिका ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी होत्या. आपल्या आशीर्वचनात त्यांनी समाजात डॉक्टरांचे स्थान सर्वोच्च असल्याने त्यांच्यावर मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. तणावमुक्त राहून निस्वार्थपणे सेवा देण्यासाठी डॉक्टरांनी वेळ काढून राजयोगा मेडिटेशन शिकण्याचे आवाहन त्यांनी केले. सुप्रभा दीदी यांनी शहरात सुरु असलेल्या सेंटरच्या माध्यमातून मेडिटेशनच्या उपक्रमाची माहिती दिली. विखे पाटील हॉस्पिटलचे प्रा. डॉ. नायकवाडी यांनी, ते स्वतः ब्रह्माकुमारीचे सदस्य असून नियमित मेडिटेशन करतात आणि त्याचा उपयोग रुग्णांच्या उपचारात केला असल्याचे सांगितले. त्यांनीही उपस्थितांना मेडिटेशन कोर्ससाठी विद्यालयात येण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन ब्रह्माकुमारी सुवर्णा दीदी यांनी केले. ब्रह्माकुमारी निर्मला दीदी यांनी आभार मानले. यावेळी नगरमधील अनेक डॉक्टर उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठाचे योगशिक्षक अभ्यासक्रमाचे प्रवेशासाठी मुदतवाढ

नगर – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत घेण्यात येणाऱ्या योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यासाठी लेट फी आकारली जाणार नाही. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी १८ वर्षे पूर्ण व बारावी पास अशी अट असून ही अट पूर्ण करणारा कोणीही व्यक्ती प्रवेश घेऊ शकतो. योग विद्या धाम अहिल्यानगर हा अभ्यासक्रम गेले १८ वर्ष घेत आहे. आत्तापर्यंत जवळजवळ ६०० विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण करून योगाच्या क्षेत्रात कार्य करीत आहेत.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर आपणास मुक्त विद्यापीठ तसेच कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठात एम ए योगशास्त्र करण्याची संधी उपलब्ध होते. तसेच योग योग विद्या गुरुकुल यांच्या योग प्रबोध व योग प्रवीण हे प्रगत अभ्यासक्रम पूर्ण करून योगामध्ये संशोधनाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

शिवाय स्वतःचा व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. त्याचप्रमाणे आयुष मंत्रालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या वायसीबी लेवल दोन पूर्ण करून आंतरराष्ट्रीय पातळीवर योगशिक्षक /योग टीचर म्हणून कार्य करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन योग विद्या धाम संस्थेचे कार्याध्यक्ष सुभाष पांढरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मो. न.९४२३६७६०५९ वर संपर्क साधावा.



महालक्ष्मी लॉन येथे आयोजित महाकिडनी आरोग्य शिबिर शिबिरामध्ये रुग्णांची तपासणी करताना वैद्यकीय अधिकारी. (छाया – लहू दळवी)

# महालक्ष्मी लॉन येथे ‘महा किडनी आरोग्य शिबिर’

नगर – कल्याण रोड, महालक्ष्मी लॉन येथे आयोजित महाकिडनी आरोग्य शिबिर शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजक ॲड. युवराज शिंदे, डॉ. सुहास बावीकर, डॉ. पूर्वा बावीकर, डॉ. इक्बाल शेख, डॉ. अनिकेत कुऱ्हाडे, जगन्नाथ हल्याळ, अर्चना परकाळे, अफसर शेख, साजिद जागीरदार, सुनिता सूर्यवंशी, निसार मास्टर, जी. एन. शेख, संभाजी चौधरी, अरुण ढाकणे यांसह नागरिक उपस्थित होते.

डॉ. सुहास बावीकर म्हणाले, मनुष्याच्या शरीरात ७९ अवयव असतात. यामध्ये सात अवयव मिळून एक सिस्टीम तयार होते आणि आपले शरीर त्यावर चालते. आपण जीवन जगताना शरीराशी खेळत असतो. व्यसन, चांगला आहार न घेणे, झोपेचे नियोजन नसणे, व्यायामापासून लांब राहणे, तसेच चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण विविध आजारांना आमंत्रण देतो. आपल्या देशात मधुमेहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. आजार झाल्यावर लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि तपासणी करणे गरजेचे आहे. किडनी आजार होऊ नयेत म्हणून जनजागृती करणे आवश्यक आहे. हा आमचा १३ वा कार्यक्रम असून राज्यभर मोफत शिबिरे आयोजित केली जातात. ॲड. युवराज शिंदे यांची समाजाप्रती असलेली बांधिलकी यामुळे हे शिबिर यशस्वी झाले. रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी मोफत रक्त तपासणीही करण्यात आली. असे ते म्हणाले.कार्यक्रमात डॉ. पूर्वा बावीकर आणि डॉ. इक्बाल शेख यांनी नागरिकांच्या किडनीसंबंधित प्रश्नांची उत्तरे दिली. प्रास्ताविक अर्चना परकाळे यांनी केले. आभार प्रदर्शन अरुण ढाकणे यांनी केले.

# माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ आणि विकास क्लाउड कम्प्यूटिंगच्या पायाभूत सुविधांवरच अवलंबून

## प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांची माहिती



न्यू आर्टस् कॉलेजमधील कम्प्यूटिंगच्या पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे.

नगर – येथील न्यू आर्टस् कॉलेजमधील सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सने क्लाउड कम्प्यूटिंगच्या पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी ५० तासांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी क्लाउड कम्प्यूटिंगला माहिती तंत्रज्ञान उद्योगाची नवी दिशा ठरवणारे तंत्रज्ञान म्हटले आहे.

प्राचार्य सागडे म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ आणि विकास आता क्लाउड कम्प्यूटिंगच्या पायाभूत सुविधांवरच अवलंबून आहे. डेटा सायन्स, आर्टिफीसियल इंटेलिजन्स यांसारख्या तांत्रिक क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी क्लाउडचे ज्ञान अनिवार्य आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

महाविद्यालयात सध्या कंप्यूटर टेक्नॉलॉजीशी संबंधित चार अभ्यासक्रम चालवले जातात. जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे कॉर्पोरेट ट्रेनिंग दिले जाते, असे त्यांनी सांगितले. या शैक्षणिक वर्षात डेटा सायन्स, कंप्यूटर सायन्स, क्लाउड कम्प्यूटिंग आणि बीसीएच्या विद्यार्थ्यांसाठी किमान १० कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

प्रास्ताविक करताना विभागप्रमुख प्रा. अरुण गांगर्डे यांनी माहिती दिली की, या प्रशिक्षणासाठी बंगळूर येथील अभियंता एन. सुधाकरण यांना निमंत्रित करण्यात आले आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील अभ्यासक्रमावर आधारित या ५० तासांच्या प्रशिक्षणामध्ये उद्योगाची व्याप्ती लक्षात घेऊन प्रात्यक्षिके आणि प्रोजेक्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रोफेशनल कॉर्पोरेट ट्रेनरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे हे विभागाचे वैशिष्ट्य असून, याचा उपयोग विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवण्यासाठी आणि स्वयंरोजगारासाठी होईल. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रियंवदा पाटील, प्रा. दीपाली जगदाळे आणि विभागातील शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# आधुनिक स्पर्धेच्या युगात कौशल्याची गरज

## के. जी. कॉलेजचा उपक्रम




नगर – आजचा काळ हा वेगवान बदलांचा, प्रचंड स्पर्धेचा आणि नव्या संधींचा आहे. केवळ शैक्षणिक पदवी मिळवणे पुरेसे राहिलेले नाही, तर त्या पदवीसोबत प्रत्यक्ष आयुष्यात आणि नोकरीत लागणारी कौशल्ये आत्मसात करणे अत्यावश्यक झाले आहे. कोणत्याही व्यवसायिक किंवा औद्योगिक संस्थेत काम करताना ज्ञानासोबत संवादकौशल्य, शिष्टाचार, आत्मविश्वास, ग्राहकांशी नीट व व्यावसायिक पद्धतीने वागण्याची कला आणि तांत्रिक साधनांचा वापर या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.

आज बहुतांश कंपन्या व संस्थांना केवळ पदवीधर नव्हे, तर कामास तयार असलेले, प्रत्यक्ष कार्यकौशल्य असलेले उमेदवार हवे असतात. अशा परिस्थितीत Receptionist आणि Frontline Communication या कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण ही दोन्ही कौशल्ये कोणत्याही संस्थेचा पहिला चेहरा घडवतात, ग्राहकांचा पहिला ठसा उमटवतात आणि संस्थेची प्रतिमा उंचावतात. योग्य प्रकारे फोन उचलणे, ग्राहकांचे स्वागत करणे, त्यांची गरज ओळखून योग्य माहिती देणे, बैठकींचे नियोजन करणे, इंग्रजी व मराठीत आत्मविश्वासाने संवाद साधणे – हे सर्व कौशल्ये असलेला व्यक्ती कुठल्याही संस्थेसाठी अनमोल ठरतो.

ही गरज ओळखून के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स (Evening College), अहल्यानगर यांनी ‘आचार्य चाणक्य स्किल एन्हान्समेंट सेंटर’ अंतर्गत Receptionist Frontline Communication Skills हा विशेष कोर्स सुरू केला आहे. हा कोर्स केवळ सैद्धांतिक नसून प्रत्यक्ष वापरातील, व्यावसायिक जगाशी जोडलेला आणि विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवणारा आहे. यात फ्रंट डेस्क व्यावसायिक पद्धतीने हाताळणे, इंग्रजी व मराठीत प्रभावी बोलणे, बॉडी लँग्वेज आणि शिष्टाचार सुधारणे, ग्राहक व पाहुण्यांशी संवाद साधणे, मुलाखतीसाठी तयारी करणे, तसेच संगणक व टेलिफोनचा मूलभूत वापर शिकवले जाईल.

या कोर्सची रचना अशी आहे की मुलं व मुली दोघेही आपल्या अभ्यासासोबत किंवा नोकरीसोबत हा कोर्स सहज पूर्ण करू शकतात. कोर्सचा कालावधी ४ आठवडे असून सायंकाळी व आठवड्याच्या शेवटी बॅचेस घेतल्या जातील. अत्यंत अल्प शुल्कात उच्च दर्जाचे, practically आधारित प्रशिक्षण मिळणार असल्याने हा कोर्स विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी ठरणार आहे.

आज नोकरीच्या मुलाखतीत उमेदवाराकडे शैक्षणिक पात्रतेसोबतच त्याच्या संवादकौशल्यांची, आत्मविश्वासाची आणि कामातील तयारीची कसून चाचणी घेतली जाते. त्यामुळे या कोर्सद्वारे मिळणारे प्रशिक्षण केवळ नोकरी मिळविण्यातच नव्हे, तर दीर्घकालीन करिअर घडविण्यातही मोलाची भूमिका बजावेल.

स्थळ : के. जी. कॉलेज, फोर्ट रोड, एल.आय.सी. ऑफिसजवळ, अहल्यानगर

संपर्क : ०९८३४७५६१४१ / ०९०७५४३००८३

मर्यादित जागा – लवकर नोंदणी करून उज्वल भविष्याची दिशा ठरवा.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम,स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १२/०८/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे नागरदेवळे** येथील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट मिळकत –

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १०३/१०४ | १२ | १६०.०० चौ.मी. |

**हा संपुर्ण खुला प्लॉट**

**यांसी चतुःसिमा** –

पुर्वेस : ६.०० मी रोड — दक्षिणेस : प्लॉट नं. ११

पश्चिमेस : प्लॉट नं. ७ व ८ — उत्तरेस : प्लॉट नं. १३

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक– श्री.अजाउद्दीन सलाउद्दीन शेख**

**ॲड.ए.जे.शेख**
बीएसएल,एलएलबी, रजि.नं.एमएएच/२३०९/२०१८
पराग बिल्डींग, कलेक्टर ऑफिसशेजारी,अहमदनगर
मो : 9422221884

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठामध्ये नमुद केलेली मिळकत ही विद्यमान मालक १.एकनाथ लहानु शिंदे, २.सुमन साहेबराव गायकवाड,३.मंदाबाई उर्फ मंडाबाई सर्जेराव गायकवाड, ४.अशोक सखाराम शिंदे यांचे मालकी वहिवाटीची आहे. विद्यमान मालकाने सदर शेतजमीन मिळकत कायमखुष खरेदीने देण्याचे ठरवुन आमचे अशिलाबरोबर खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली शेतजमीन मिळकत विक्री करण्याबाबत करार करुन विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरोसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित कोणाचेही कोणतीही तक्रार अगर हरकत अथवा गहाण,दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, वहिवाट, कुळ, बोजा, कर्ज, इकरार अथवा इतर कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही तक्रार चालणार नाही. मुद्दामहून कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिली आहे. तसेच सदरचे मिळकतीबाबत कोणीही नवीन कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, याकरीताही सदरची नोटीस प्रसिध्द दिली आहे.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :**– डि।। अहिल्यानगर सब डि.ता.नगर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील मौजे वडगाव गुप्ता येथील गट नं. ११५ चे क्षेत्रफळ १ हे.२४ आर याचा आकार १ रु.२४ पै यापैकी १. एकनाथ लहानु शिंदे, २.सुमन साहेबराव गायकवाड, ३.मंदाबाई उर्फ मंडाबाई सर्जेराव गायकवाड, ४.अशोक सखाराम शिंदे यांचे प्रत्येकी ७.७५ आर असे एकुण ३१ आर क्षेत्र. सदरचे क्षेत्र हे गटाचे उत्तरेकडील बायपास लगतचे रोड वाईडींगचे क्षेत्र सोडूनचे क्षेत्र ० हे.३१ आर ही शेतजमीन मिळकत आहे.

**यांसी चतुःसीमा**– पुर्वेस :– गट नं. ११५ पैकी उर्वरीत क्षेत्र, दक्षिण :– गट नं. ११५ मधील अशोक सखाराम शिंदे व भाऊ लहानु शिंदे व सचिन सुरेश शिंदे व इतर यांचे क्षेत्र, पश्चिम :– लागु गट नं. ११६, उत्तरेस :– बायपास रोड,ही चतु:सिमापुर्वक शेतजमीन मिळकत, त्यातील तदंगभुत वस्तुसह काहीएक राखुन न ठेवता त्यातील सर्व हक्क, अधिकार,वाग, वहीवाटसह काहीही एक राखून न ठेवता.

**ॲड.दीपक पोपटराव धीवर**
चेंबर नं.१०९, लॉयर्स चेंबर्स, जुने जिल्हा न्यायालय आवार, अहमदनगर, मो : 8999747121

तारीख : १२/०८/२०२५.
अहमदनगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकतविक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.१२/०८/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे शहर अहिल्यानगर येथील** खालील वर्णनाची मिळकत –

**सिटी सर्व्हे नं. २९३ याचे एकूण क्षेत्र ३८६.३० चौ.मी. यापैकी दक्षिण बाजूची जागा तिची दक्षिण–उत्तर लांबी ६८.०० फुट ८.०० इंच व पुर्व–पश्चिम रुंदी २१.०० फुट ९.०० इंच याचे एकुण क्षेत्र १३८.७५ चौ.मी. यापैकी उत्तर बाजुकडील १/२ जागा तिचे क्षेत्र ६९.३८ चौ.मी. ही संपूर्ण जागा त्यावरील सर्व तदंगभुत वस्तुसह काही एक राखुन न ठेविता.**

**यांसी चतुःसीमा** –

पुर्वेस :– सिटी सर्व्हे नं.२९४ — दक्षिणेस :– सिटी सर्व्हे नं. २९३ पैकी

पश्चिमेस :– रस्ता — उत्तरेस :–सिटी सर्व्हे नं.२९३ पैकी

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक – प्रविण प्रभाकर जुंदरे**
रा. तोफखाना, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅंक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.१२/०८/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे निंबळक येथील शेतजमिन** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे – **गट नंबर ५२३/२ चे एकुण क्षेत्र ० हे.६७ आर याचा आकार २ रु.४१ पैसे. ही संपुर्ण शेतजमिन मिळकत.**

**यांसी चतुःसीमा** –

पूर्वेस : गट नं.४९२ — दक्षिणेस : गट नं. ५२३/३

पश्चिमेस : लागू रस्ता — उत्तरेस : गट नं. ५२३/१

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**१. बाळासाहेब अर्जुन कोतकर,** रा. घर नं. ५०९, ग्रामपंचायत जवळ,निंबळक, अहिल्यानगर.
**२. उध्दव रावसाहेब अमृते,** रा. वाटेफळ, विठ्ठल रुख्मिणी मंदिरा जवळ, अहिल्यानगर.
**३. दत्तात्रय शंकर कोतकर,** रा. मु.पो. निंबळक, ता.जि. अहिल्यानगर.
**४. किरण छबुराव कांडेकर,** रा. हमीदपूर, ता.जि अहिल्यानगर.

**ॲड.समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# आरोग्य अभियानांतर्गत अधिकारी, कर्मचाऱ्यांचे १९ ऑगस्ट पासून बेमुदत 'काम बंद आंदोलन'

## राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी, कर्मचारी जाणार बेमुदत संपावर


जिल्हा अहिल्यानगर येथील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयात सन २००५ पासून कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या अधिकारी तसेच कर्मचारी यांनी विविध मागण्यासाठी १९ ऑगस्ट पासून बेमुदत काम बंद आंदोलन करणार असल्याचा निर्णय घेतला असून तसे निवेदन जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. संजय घोगरे जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर यांना देण्यात आले आहे.

नगर – जिल्हा अहिल्यानगर येथील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयात सन २००५ पासून कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या अधिकारी तसेच कर्मचारी यांनी विविध मागण्यासाठी १९ ऑगस्ट पासून बेमुदत काम बंद आंदोलन करणार असल्याचा निर्णय घेतला असून तसे निवेदन जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. संजय घोगरे जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर यांना देण्यात आले आहे.

याबाबत निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना नियमित शासन सेवेत समायोजन होत असलेल्या विलंबाबाबत शासन निर्णय नुसार दहा वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत समायोजन करणे बाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. परंतु सव्वा वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन गेला आहे. तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. कर्मचारी तुटपुंज्या मानधनावर काम करत आहे. राज्यपाल महाराष्ट्र राज्य विधिमंडळ २०२५ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात मुद्दा क्रमांक ५२ नुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे निर्णय घेतला आहे त्यानुसार त्यांना आरोग्य सेवेतील मान्यता व प्राप्त सर्व कक्ष पदावर सामावून घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते परंतु अभिभाषणामधील या निर्णयाच्या अंमलबजावणी पूर्ण झालेली नाही. एन एच एम कर्मचारी यांना दहा टक्के मानधन व रॉयल्टी बोनस लागू करावा ग्रॅज्युटी तसेच ज्या कर्मचाऱ्यांची मानधन १५५०० पेक्षा जास्त आहे अशा कर्मचाऱ्यांनाही ईपीएफ ची योजना लागू करण्यात यावी. अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्य बजावत असताना अपघात मृत्यू झाल्यास रुपये ५० लाख सानुग्रह अनुदान लागु करावे. तसेच कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास पंचवीस लाख सानुग्रह अनुदान मिळावे, अपघात झाल्यास दोन ते पाच लाख औषध उपचारासाठी सानुग्रह अनुदान मिळावे, आशा स्वयंसेवक व गटप्रवर्तक यांचे सानुग्रह अनुदान पत्र नुसार ५ मार्च २०२५ तसेच ज्या पद्धतीने अंगणवाडीतील कर्मचारी यांना गट विमा लागू करण्यात आला आहे त्या धर्तीनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी कर्मचारी व कर्मचारी यांनाही गट विमा विमा लागू करण्यात यावा, सोळा सतरा वर्षापासून अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनात २५ टक्के वाढ करण्यात. समुदाय आरोग्य अधिकारी यांची रुपये २५००० मानधन व पी बी आय रुपये १५००० हे वेगळे न करता एकत्रित रुपये चाळीस हजार मानधन अदा करावे, समुदाय आरोग्य अधिकारी यांचे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार दहा वर्षाची अट शिथिल करून समायोजन धोरण लागू करावे, विभागनिहाय रिक्त जागा अधिकृतपणे जाहीर कराव्यात, ग्रामविकास विभाग डीएमईआर नगर विकास आरोग्य विभाग या विभागांच्या पदभरती जाहिरात प्रसिद्ध करणे पूर्वी १४ मार्च २०२४ शासन निर्णय प्रमाणे कर्मचारी व अधिकारी यांचे समायोजन करण्यात यावे, दहा वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक मूल्यमापन अहवाल व त्या आधारे पुनर्नियुक्ती प्रक्रिया बंद करावी. एकूण ६९ संवर्गापैकी फक्त २ स्वर्गाची समायोजन झाले. बाकी तांत्रिक अतांत्रिक अधिकारी कर्मचारी यांच्या समायोजनासाठी खूप विलंब होत आहे अशा विविध स्वरूपाच्या मागण्यांसाठी १० व ११ जुलै रोजी आझाद मैदानावर आंदोलन करून आरोग्यमंत्री यांची भेट घेऊन सुद्धा वरील मागण्या मान्य होत नसल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य यांनी पुकारलेल्या १९ ऑगस्ट पासून बेमुदत काम बंद जिल्हा रुग्णालयातील जिल्ह्यातील सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी सहभागी होत आहे.

निवेदनावर राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम प्रमुख उदय देशपांडे, विजय गायकवाड, गोरखनाथ काळे, विनायक आडेप, संतोष तीळवले, संजय पालवे, डॉ. आशिष इरमल, शुभदा टेपाळे, सीमा आंधळे, संगीता दगडे, अश्विनी उगले, सुषमा साठे इत्यादी यांचे सह सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनाही देण्यात आले. जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत काम बंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही असे या निवेदनात म्हटले आहे.

# छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक प्रवेशद्वार भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी : प्रा. ना. राम शिंदे


छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकस्थळी उभारलेल्या मराठकालीन शैलीतील प्रवेशद्वाराचे लोकार्पण प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

नगर – छत्रपती चौथे शिवाजी महाराज हे स्वराज्य, स्वातंत्र्य आणि जनकल्याणाच्या कार्यासाठी सदैव प्रेरणास्थान आहेत. येथे उभारलेले प्रवेशद्वार हे केवळ भव्य वास्तू नसून, भावी पिढ्यांना देशभक्ती, शौर्य आणि ऐक्याचा संदेश देणारे स्मारक ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला.

शहरातील छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकस्थळी उभारण्यात आलेल्या मराठकालीन शैलीतील प्रवेशद्वाराचे लोकार्पण प्रा. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बाळासाहेब पवार, अमोल गाडे, सागर बोरुडे, काकासाहेब तापकीर, सौ. नंदाताई पांडुळे, स्मारक समितीचे यशवंत तोडमल आदी उपस्थित होते.

आमदार स्थानिक विकास निधीतून अहिल्यानगर शहरात उभारण्यात आलेल्या या प्रवेशद्वाराचे लोकार्पण माझ्याच हस्ते करण्याचा मला मनःस्वी आनंद आहे, असे प्रा. शिंदे म्हणाले. या उपक्रमाच्या यशासाठी स्मारक समिती, स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटना आणि स्थानिक नागरिक यांचे सहकार्य मोलाचे ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

अशा स्मारकांमुळे आपला ऐतिहासिक वारसा जपला जातो आणि समाजात एकतेचा तसेच प्रेरणेचा संदेश पोहोचतो. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच परिसराच्या स्वच्छतेसाठी महानगरपालिकेला लक्ष देण्याची सूचना त्यांनी केली.

कार्यक्रमास समितीचे सदस्य आदी नागरिक उपस्थित होते.

### विविध विकासकामांची पाहणी

स्मारक परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची प्रा. शिंदे यांनी यावेळी पाहणी केली. ही कामे उत्तम पद्धतीने सुरू असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करा

नगर – जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ चे आयोजन शांघाई येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलला भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची ही संधी ऑलिम्पिक खेळांच्या तोडीस तोड मानली जाते. यापूर्वी झालेल्या ४७ व्या जागतिक कौशल्य स्पर्धेत ६३ क्षेत्रांमधून ५० देशांतील १० हजारांहून अधिक उमेदवार सहभागी झाले होते. ही स्पर्धा १५ देशांत १२ आठवडे चालली होती.

२०२६ च्या जागतिक स्पर्धेसाठीच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय आणि विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने कौशल्य स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविली जातील.

या स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष आहे. पन्नास क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असावा. तर डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, आयसीटी नेटवर्क सुरक्षा, डिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्रीअल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मेकाट्रॉनिक्स, रोबोट सिस्टीम इंटीग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी आणि एअरक्राफ्ट या क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.

शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरील प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन करण्यासाठी सर्व प्रशिक्षण संस्था तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्थांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा शासन आदेश निर्गमीत होण्यासाठी अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'निदर्शने'

## शासनाचे लक्ष वेधून सप्टेंबरमध्ये बेमुदत संपाचा इशारा



राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा शासन आदेश निर्गमीत होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

नगर – पेन्शनबाबत घोषित करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा शासन आदेश निर्गमित होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालया समोर ११ ऑगस्ट रोजी सरकारी, निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाद्वारे सप्टेंबरमध्ये बेमुदत संपाचा इशारा देऊन शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, विजय काकडे, पुरुषोत्तम आडेप, अशोक मासाळ, संदिपान कासार, भागवत नवगण, वैशाली बोडखे, श्रीमती व्हि.डी. नेटके, भाऊ शिंदे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे, वासुदेव राक्षे, पोपटराव राऊत, बंडोपंत दंडवते, प्रवीण हिकरे, रणजीत रासकर, पल्लवी तोडमल, सौ. म्हस्के, शितल गांधी, अनिता दातरंगे, सुवर्णा वैद्य, सविता कुक्कडवाल आदी कर्मचारी, शिक्षक सहभागी झाले होते.

जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना राज्यातील कर्मचारी शिक्षकांनी आंदोलनाने मिळवलेली आहे. परंतु अद्याप याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही. कै. र.ग. कर्णिक यांच्या नेतृत्वाखाली १२, ३७ आणि ५४ दिवसांचे संप झाले. त्यामुळे केंद्राप्रमाणे वेतन व भत्ते हे सूत्र मिळाले. पेन्शनबाबत राज्य सरकारची भूमिका नकारात्मक होती. पेन्शनची गरज आणि निकड वारंवार पटवून देऊनही सरकार प्रतिसाद देत नव्हते. त्यामुळे राज्यातील २०२३ साली १७ लाख कर्मचारी बेमुदत संपावर गेले. सेवानिवृत्त होणारे कर्मचाऱ्यांचे आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचे तत्त्व मान्य करून सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य समिती नेमण्यात आली. जुन्या पेन्शनची जवळजवळ सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आंदोलनातून मिळवलेली आहे. परंतु त्याबाबतचा अध्यादेश लवकरात लवकर निर्गमित करावा, अशी मागणी करण्यात आलेली आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाचा स्वीकार करताना प्रत्यक्षात कोणत्या व्यवहारिक अडचणी निर्माण होतील, याचा शासनाने विचार केलेला दिसत नाही. पटसंख्या संदर्भातील शासनाचा आदेश शिक्षक संवर्गाच्या मुळावर येत आहे. आरोग्य विभाग संदर्भात अलीकडेच मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्याची आरोग्य योजना देशातील अन्य काही राज्यांच्या तुलनेत तितकीशी कार्यक्षम नाही हे मान्य करण्यात आले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पेन्शनबाबत घोषित करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा शासन आदेश निर्गमित व्हावा, अन्यथा सप्टेंबरमध्ये पुन्हा बेमुदत संपाचा इशारा देण्यात आलेला आहे.



बाणेश्वर महाविद्यालायात ग्रंथपाल दिनानिमित ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

# राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त बाणेश्वर महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन

नगर – श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ग्रंथालय विभागाच्या वतीने १२ ऑगस्ट रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती निमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथालयामध्ये ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एम. जाधव यांच्या हस्ते डॉ. एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून ग्रंथ प्रदर्शनाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख IQAC Coordinator प्रा. डॉ. एच. आर. शेख, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे व इतर प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ए. एस. दळवी यांनी डॉ. एस आर रंगनाथन यांचे जीवन व त्यांचे ग्रंथालय विषयाशी निगडीत महत्वपूर्ण योगदान याबद्दल माहिती दिली. तदनंतर अध्यक्ष महोदयानी आपले मनोगत व्यक्त करताना वाचन आपल्याला नवीन जगाची ओळख करून देते. त्याद्वारे आपले ज्ञान वाढते, कल्पनाशक्ती विकसित होते आणि भाषिक कौशल्ये सुधारते वाचन आपल्याला जगाकडे अधिक चांगल्या प्रकारे पाहण्यास मदत करते. वाचन हे ज्ञानार्जनाचे एक साधन आहे. तसेच वाचन ही जीवनभर पुरणारी शिदोरी आहे, असे सांगितले व त्यांची स्व प्रकाशित पुस्तके ग्रंथालयास भेट दिली.

तसेच विज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ.वाघ एस जी व प्रा.राऊत पी एस यांनी काही पुस्तके ग्रंथालयास भेट म्हणून दिली. तसेच याप्रसंगी श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक शिवाजीराव कर्डिले व संचालक अक्षय कर्डिले यांनी ग्रंथपाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ग्रंथप्रदर्शनास विद्यार्थ्यांनी प्रतिसाद नोंदविला.


रामदास आठवले यांचा अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने दिल्लीमध्ये सत्कार करण्यात आला.

# अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने रामदास आठवले यांचा दिल्लीत सत्कार

नगर – रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने दिल्ली येथे सत्कार करण्यात आला.

रिपब्लिकन पक्षाला उत्तराखंडमध्ये मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदन करुन होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये नगर जिल्ह्यात महायुतीतून रिपब्लिकन पक्षाला अधिक जागा मिळण्याची मागणी करण्यात आली.

या सत्कार सोहळ्यास रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, माजी नगरसेवक राहुल कांबळे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पाथर्डी तालुका अध्यक्ष बाबा राजगुरू, शेवगाव तालुका अध्यक्ष सतीश मगर, नगर तालुका अध्यक्ष अविनाश भोसले, जामखेड तालुका अध्यक्ष शिवाजी साळवे, जिल्हा सचिव गणेश कदम, सिद्धांत दाभाडे आदी उपस्थित होते.

# एमआयडीसीतील वर्कशॉपमधून कामगाराकडून १ लाख २५ हजारांच्या कॉपरच्या प्लेट्सची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरातील वेदांत इंटरप्रायजेस या फॅब्रिकेशन वर्कशॉपमधून कामगारानेच सुमारे १ लाख २५ हजार रुपये किमतीच्या ३५० किलो वजनाच्या ८६ कॉपरच्या प्लेट्सची चोरी केल्याची घटना ८ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० या कालावधीत घडली.

याबाबत फॅब्रिकेशन व्यवसाय करणारे विलास दादाभाऊ खुडे (वय ४२, मूळ रा.वडगाव तांदळी, ता. नगर. हल्ली रा. डॉन बॉस्को, सावेडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी यांचे एमआयडीसी येथील ए एल ब्लॉक येथे ओम फोर्स शेजारी, वेदांत इंटरप्रायजेस नावाचे वर्कशॉप आहे. वर्कशॉपला दोन चाव्या असल्याने एक चावी वर्कशॉप मधील कामगाराकडे असतें. रक्षाबंधनानिमित्त वर्कशॉप ९ आणि १० ऑगस्ट रोजी दोन दिवस बंद असल्याने फिर्यादी यांनी ११ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास वर्कशॉप उघडले असता त्यांना वर्कशॉप मधील ३५० किलो वजनाच्या १ लाख २५ हजार रुपये किमतीच्या ८६ कॉपर प्लेट्स दिसून आल्या नाही.

याबाबत त्यांनी कामगार शुभम आगळे याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. वर्कशॉपचे कुलूप तुटलेले नाही. दरवाजा व्यवस्थित आहे. मग चोरी झालीच कशी?.यावरुन वर्कशॉपमधील कामगार शुभम रामदास आगळे (रा. कळसे वस्ती, निंबळक, हल्ली रा. एमआयडीसी) यानेच चोरी केल्याचा संशय त्यांना आला. त्यामुळे फिर्यादी यांनी कामगार आगळे यास घेऊन एमआयडीसी पोलीस ठाणे गाठले व एमआयडीसी पोलिसांना सर्व हकीकत सांगितली. एमआयडीसी पोलिसांनी आगळे याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने वर्कशॉप मधून प्लेटांची चोरी केल्याचे कबुल केले. तसेच चोरलेल्या प्लेटा कोठे विकल्या व कोठे ठेवल्या याबाबत पोलिसांना माहिती दिली. त्यामुळे पोलिसांनी त्यास तात्काळ ताब्यात घेतले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विलास खुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शुभम आगळे यांच्या विरुद्ध बी एन एस कलम ३०६अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार आडबल हे पुढील तपास करत आहेत.


बेंच प्रेस स्पर्धेत प्रथम आलेल्या शहबाज शेख याचा सन्मान करताना प्रशिक्षक वसिम शेख आदी.

# बेंच प्रेस स्पर्धेत शहबाज शेख प्रथम

नगर – नुकत्याच पार पडलेल्या बेंच प्रेस स्पर्धेत शहबाज शेख याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याला ट्रॉफी, प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी डेव्हिड मकासरे, सायमन मकासरे, श्री. गिते, राजू तांबोळी, मुन्ना तांबोळी आदी उपस्थित होते.

त्याला स्टॅमिना स्पोर्टस् अकॅडमीचे संचालक व अध्यक्ष आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते वसीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले. माहितीसाठी (मो.८३२९१९१८५९, ९८५०३२८६५).

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

